शनिवार, 15 ऑक्टोबर 2022

⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - 02 ⊙ अंक -70

Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी





● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 15 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-70 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5


## चर्चेतली बातमी

### माओवाद्यांशी प्रा. साईबाबा यांचा संबंध नाही : न्यायालय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जवळपास १० वर्षांपूर्वी देशात शहरी नक्षलवादाची मोठी चर्चा चालू होती. यासंदर्भात अनेक ठिकाणी पोलिसांकडून कारवाईही करण्यात आली होती. याच काळात देशभरात गाजलेली गडचिरोली पोलिसांची कारवाई म्हणजे दिल्ली विद्यापीठाचे तत्कालीन प्राध्यापक जी. एन. साईबाबा यांना झालेली अटक. त्यावेळी साईबाबा यांच्यासमवेत जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थी हेम मिश्रा यांच्यासह इतर काही आरोपींना गडचिरोली पोलिसांनी अटक केली होती. माओवाद्यांच्या शहरी नेटवर्कला मोठा धक्का देणारी कारवाई, असे या अटकेचे वर्णन तेव्हा केले गेले. मात्र, आता प्राध्यापक साईबाबा यांची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर साईबाबा यांच्याकडून दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी झाली. २०१७मध्ये साईबाबा यांना नक्षलवाद्यांशी संबंध असल्याच्या आरोपात दोषी मानत सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या आदेशांना आव्हान देणारी याचिका साईबाबा यांच्यावतीने नागपूर खंडपीठासमोर दाखल करण्यात आली होती.

# शिवलिंग कार्बन डेटिंग टेस्टला नकार

## ज्ञानवापी मशिद प्रकरण : न्यायालयाचा हिंदू पक्षकारांना झटका

आधुनिक केसरी न्यूज

**वाराणसी : वाराणसीतील ज्ञानवापी मशिदीमध्ये सापडलेल्या 'शिवलिंगा'चा काळ कार्बन डेटिंग पद्धतीने शोधण्याची मागणी जिल्हा न्यायालयाने फेटाळली आहे. चार हिंदू महिलांनी ही याचिका दाखल केली होती. न्यायालयाने १२ सप्टेंबरला दाखल झालेली ही याचिका स्वीकारली होती. तसेच मशिदीच्या व्यवस्थापनाने यावर आपले म्हणणे मांडावे, असे आदेशही देण्यात आले होते. दरम्यान, शुक्रवारी झालेल्या सुनावणीदरम्यान वाराणसी न्यायालयाने कार्बन डेटिंगसारखे सर्व्हे केल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होईल असे सांगत याचिका फेटाळून लावली.**






सर्वोच्च न्यायालयाने शिवलिंग सापडलेली जागा सुरक्षित ठेवण्यास सांगितलेले असताना कार्बन डेटिंगसारखे सर्व्हे केल्याने आदेशाचे उल्लंघन होईल असे वाराणसी कोर्टाने सांगितले आहे. तसंच सर्वोच्च न्यायालयाने शिवलिंगाची सुरक्षा करण्यास सांगितलेले असताना त्याला कोणतेही नुकसान झाले तर तेदेखील आदेशाचे उल्लंघन ठरेल असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच शिवलिंगला काही नुकसान झाले तर धार्मिक भावना दुखावतील आणि त्यानंतर निर्माण झालेल्या वादावर कायदेशीर तोडगा निघणार नाही असेही न्यायालयाने मागणी फेटाळताना सांगितले. मशीद व्यवस्थापनाने मात्र अशा कोणत्याही प्रकारचा तपास करण्यास विरोध केला आहे. हे प्रकरण मशिदीच्या आतील मंदिरात पूजा करण्याबद्दल आहे आणि त्याचा त्याच्या संरचनेशी काहीही संबंध नाही असा युक्तिवाद त्यांनी केला आहे. मुस्लिम पक्षकारांनी हे शिवलिंग नसून पाण्याचे कारंजे असल्याचा दावा केला आहे. मशिदीच्या भिंतीनजीक असलेल्या हिंदू देवतांच्या मूर्ती तसेच शृंगारदेवी मंदिरात दररोज पूजा करण्याची परवानगी द्यावी, यासाठी याचिकाही न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार झालेल्या सर्वेक्षणात मशिदीच्या वझुखान्याजवळ सापडलेली वस्तू प्राचीन शिवलिंग असल्याचा हिंदू पक्षकारांचा दावा असून हे केवळ कारंजे असल्याचे मशीद व्यवस्थापनाचे म्हणणे आहे. पूजेच्या मागणीवरील याचिकेवर अद्याप निर्णय झालेला नाही.

# नाटककार एलकुंचवार यांना जीवनगौरव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्रसिद्ध नाटककार, पटकथाकार, लेखक, निबंधकार,



अभिनेते आणि प्राध्यापक महेश एलकुंचवार यांना यंदाचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. टाटा समूहातर्फे आयोजित केला जाणाऱ्या साहित्य महोत्सवात हा पुरस्कार दिला जाणार आहे. महेश एलकुंचवार हे भारतातील सर्वात प्रभावशाली साहित्यिक म्हणून ओळखले जातात.

भारतीय रंगभूमीवरील महान नाटककार म्हणूनही त्यांचा नावलौकिक आहे. 'यातनाघर', 'वासनाकांड', 'गार्बो', 'वाडा चिरेबंदी' 'मग्न तळ्याकाठी', 'युगांत', 'आत्मकथा', 'वासांसि जीर्णानि', 'सोनाटा', 'एका नटाचा मृत्यू' ही महेश एलकुंचवार यांची गाजलेली नाटकं आहेत. त्यांनी आतापर्यंत नाट्यमय अभिव्यक्तीचे अनेक प्रकार आपल्या नाट्य लेखनातून सादर केलेले आहेत. यात वास्तववादी , प्रतीकात्मक, अभिव्यक्तीवादी शैलीत त्यांनी रचना केलेल्या आहेत. जीवनवादी नाटककार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. महेश एलकुंचवार यांची नाटकं फार प्रसिद्ध आणि लोकप्रिय आहेत. त्या नाटकांचे भाषांतर भारतीय आणि अनेक पाश्चिमात्य भाषांमध्ये केले जात असे. टाटा समूहातर्फे दरवर्षी साहित्य महोत्सवाचे आयोजन केले जाते. या महोत्सवात दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांना दिला जाहीर झाला आहे. या पुरस्काराबद्दल बोलताना महेश एलकुंचवार म्हणाले, मी फार आनंदी आहे की मला टाटा समूहातर्फे जीवनगौरव पुरस्कार प्रदान केला जात आहे.

हा पुरस्कार माझ्यासाठी फार मौल्यवान आहे. मला कधीतरी हा पुरस्कार मिळेल याबद्दल मी कल्पनाही केली नव्हती. याआधी नायपॉल, महाश्वेतादेवी व रस्किन बॉन्ड यांच्यासारख्या जागतिक पातळीवर नावाजलेल्या लेखकांना हा पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या पंगतीत आता मला बसायला मिळेल. माझ्यासाठी ही थोडी संकोचाची भावना आहे, अशा शब्दांत महेश एलकुंचवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# अतिवृष्टीमुळे द्राक्षबागांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज



**सांगली :** सलग पडत असलेल्या परतीच्या पावसाने फळछाटणी झालेल्या द्राक्ष बागावर दावण्या या बुरशीजन्य रोगाचा हल्ला झाला असून काढणीला आलेले सोयाबीन, भाजीपाला पाणी साचल्याने हातचे गेले आहे. परतीच्या पावसाने वाळवा व शिराळा तालुक्याला झोडपून काढले असून उसाच्या फडासह सर्वच उभे पिके पाण्यात आहे. गेल्या चार दिवसांपासून जिल्ह्याच्या विविध भागात आंधळी नक्षत्राच्या नावाप्रमाणे पाऊस पडत आहे. ऑक्टोबर महिन्यात उन्हाची तीव्रता अपेक्षित असताना पहाटेपासून पावसाची उघडझाप सुरू राहते. दिवसभर ढगाळ हवामान राहिल्याने पिकांनाही नुकसानकारक ठरत आहे. उसासह काढणीला आलेल्या सोयाबीन, भाजीपाला, भुईमूग, उडीद पिकामध्ये मोठया प्रमाणावर पाणी साचून राहिल्याने काढणीसाठी संधीच मिळेना झाली असून पावसाने सोयाबीनच्या शेंगा जागेवर फुटत आहेत. रब्बी हंगामाची पेरणीही करण्यासाठी घात मिळेना झाली आहे. काही द्राक्ष बागांच्या छाटण्या पूर्ण झाल्या असून या बागेतील द्राक्ष घड पोंगा अवस्थेत आहे, तर काही बागामध्ये कळी अवस्थेत आहेत. सततच्या पावसाने दावण्या या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. बागेच्या एखाद्या कोपऱ्यातील पानावर दिसणारा दावण्या रोग २४ तासांत सर्व बागेत पसरू शकतो, तर ४८ तासांत कोवळ्या घडावर आक्रमण होऊन संपूर्ण पीक नष्ट होऊ शकते. या रोगाला आळा घालण्यासाठी महागडी औषधे फवारली, तरी पावसाने उपयोग शून्य ठरत असल्याने द्राक्ष बागायतदार धास्तावला आहे. गेल्या २४ तासांत जिल्ह्यात तालुका पातळीवर नोंदला गेलेला पाऊस असा – मिरज १०.८, जत ६, विटा ३.९, वाळवा ५६.५, तासगाव ५.८, शिराळा ५९.८, आटपाडी ०.२, कवठेमहांकाळ ४.५, पलूस १४.६ आणि कडेगाव १० मिलीमीटर.

# ऊसतोड कामगारांची दिवाळी यंदा फडातच होणार...!

## ग्राऊंड रिपोर्ट : संगे घेऊन लाडीला... निघालो ऊसाच्या तोडीला...!

आधुनिक केसरी न्यूज

शांताराम मगर

वैजापूर : ऐन दिवाळीच्या तोंडावरच ऊसतोड मजूर आपल बिऱ्हाड घेऊन जाताना दिसत आहे.वैजापुर तालुक्यातून सर्वाधिक ऊस तोड कामगाराची संख्या सर्वाधिक आहे. दरवर्षी दिवाळीच्या तोंडावर आपल बिऱ्हाड घेऊन जाणाऱ्या कामगारांची दिवाळी त्यांच्या घरीच होईल अशी अपेक्षा होती.परंतु अतिवृष्टीमुळे पिक हातची गेल्याने ऐन दिवाळीत शेतकर्याचे दिवाळे निघाले असल्याने तालुक्यातील गावगावचे ऊसतोडणी कामगार.

संग घेऊन लाडीला..निघालो ऊसाच्या तोडीला असे म्हणत कारखान्यांकडे मार्गस्थ होताना दिसत आहे. वैजापूर तालुक्यातील मन्याड खोर्यात ऊसतोड कामगारांची संख्या अधिक आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळेच पिकांचे नेट उत्पन्न पदरात पडत नसल्यानेच या भागातील नागरिक ऊसतोडणीसाठी जात असतात. ऊस तोडीची अनामत रक्कम घेऊन सहा महिन्याच्या करारानुसार तलवाडा लोणी खुर्द वाकला भादली पाराळा खरज चिकटगाव खंडाळा या भागातील उसतोडणी मजूर पाटस, चंद्रभागा, अकलूज, निराभिमा, सोमेश्वर, बारामती यासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक कारखान्यावर पोटाची खळगी भरण्यासाठी ऊसतोड कामगारांना आपल्या कुटुंबासह जातात. ऊसतोड मजुरांचे आठ ते पंधरा दिवसात या गावाहून त्या गावाला कामगारांचा टोळ्याचे स्थलांतर होत असल्याने तसेच अनेक ठिकाणी शाळांची सोय नसल्याने ऊसतोड कामगारांच्या पाल्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे.


गाव सोडून कोसो मैल दूर जाणाऱ्या स्थलांतरित मजुरांचा आकडा समोर आला नसला तरी दरवर्षीप्रमाणे यंदा तालुक्यातून 25000 हजाराच्यावर ऊसतोड मजुरांचे स्थलांतर झाले असल्याचे बोलले जात आहे. तालुक्यातील बहुतांश शेतमजूर ऊस तोडणीसाठी बाहेर जिल्ह्यातून बाहेर गावी जातांना दिसत आहे



उन वारा पाउसाचा विचार न करता ती रात दिवस काम करत असते .पांघरायला आभाळ असतं अन झोयायला काळ्या मातीचीच गादी .अंघोळीची तर शोकांतिकाच आहे वाढे . पोती काठ्यांना गुंडाळून आडोसा करायचा गावाला जाग यायच्या आधीचसगळ आटपावं लागतं .

**अनिता सोनवणे, ऊसतोड कामगार**

**दिवाळी करायला सवड हाय कुणाला ? :** ऊसतोडणी कामगारांना दिवाळीचं काहीच कौतुक नाही . लहान मुलं इथं तर थोडी मोठी पोरं गावाकडे . त्यांना ठेवून दिवाळीचा घास कडूच लागणार ना ? दोन–चार लाडू केले तर केले नाहीतर बाजरीची भाकरी मिरची हाटून खायचा . ऊस तोडायला येताना मुकादमाकडून उचल घ्यायची . सहा महिने राब राब राबून पोटाला चिमटा काढून उचल फेडायची . घेतलेल्या उचलीमधून पोरांची शिक्षणं अन् लग्न करायची . तोडलेल्या उसाचे वाढे विकून रोजचं तेल–मीठ भागवायचं, अशी खंत राजु सोनवणे यांनी दैनिक आधुनिक केसरीशी बोलताना व्यक्त केली .




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# अनंत अमुची ध्येयासक्ती...

आधुनिक केसरी

आजच्या लेखातून मी तुमच्यासमोर उलगडणार आहे एका अथक जिद्दीचा प्रवास. आजच्या या लेखाची नायिका आहे सेब्री टेंबरकेन (Sebria Tenberken). ही एक जर्मन मुलगी. १९७० मध्ये जन्मलेली. आज पन्नाशीत आहे. पण या पन्नास वर्षांचा तिचा प्रवास तुम्हा आम्हाला थक्क करणारा आहे. अक्षरशः डोंगराएवढी कामगिरी केली या मुलीने. त्याचे झाले असे. लहानपणी सेब्री एकदा बर्फावर स्केटिंग करत असताना तिला एक अपघात झाला. या अपघातात तिच्या डोळ्यांना गंभीर इजा झाली. तिच्या आईवडिलांनी तिची दृष्टी जाऊ नये म्हणून खूप प्रयत्न केले. विविध डॉक्टर्सना दाखवले. पण त्या सगळ्यांनी त्यांची निराशाच केली. तिची दृष्टी हळूहळू जाईल आणि बारा वर्षांची होईपर्यंत ती पूर्णपणे अंध होईल असे सांगितले. या काळात सेब्री शाळेत जात होती. लिहावाचायाला शिकली होती. तिला ही गोष्ट कशी सांगायची ? आईवडिलांची हिम्मत होत नव्हती. म्हणून तिच्या आईवडिलांनी काही दिवस याबाबत तिला सांगितलेच नाही. पण हळूहळू तिची दृष्टी जाऊ लागली आणि एक दिवस तिच्या आईवडिलांना तिला ही गोष्ट सांगावीच लागली.

ती बारा वर्षांची झाली तोपर्यंत तिची दृष्टी पूर्णपणे गेली होती. आणि आतापर्यंत लिहिणारी,



वाचणारी, रंगरूप पाहू शकणारी सेब्री अचानक अंधारात ढकलली गेली होती. खरं म्हणजे अंधांच्या जीवनात अंधार असतो असं तुम्ही आम्ही म्हणतो. सेब्रीने या गोष्टीला छेद दिला आहे. इंग्रजीत एक छान वाक्य आहे. ‘ When God closes one door , he opens another . ‘ सेब्रीच्या बाबतीत असंच काहीसं झालं. आता तिचा कान हा तिचा ‘गेटवे टू लाईफ ‘ बनला. तिचे डोळे गेले होते पण मेंदूतील दृष्टिकेंद्र अधिक सक्रिय झालं होतं . त्यामुळे माझं जीवन अधिक ‘ कलरफुल ‘ झालं होतं असं सेब्री म्हणते.

आता सेब्रीचे वडील तिला पुस्तकं वाचून दाखवायचे. असंच एकदा त्यांनी एका कृष्णवर्णीय लेखकाने लिहिलेले ‘ Black Is Beautiful ‘ हे पुस्तक वाचून दाखवलं. काळ्या रंगात सुद्धा सौंदर्य असतं याची जाणीव त्यातून तिला झाली. आणि आपल्या अंधपणात सुद्धा असंच काहीसं सौंदर्य दडलेलं असेल. (क्रमशः)




# आनंदी पहाट

## मानसिक स्वास्थ्यासाठी समस्यांचा सामना करावा

आधुनिक केसरी

आपल्या अंतर्मनातील आनंद निर्माण करण्याची बाब ही जितकी महत्वाची असते तितकेच सौंदर्याला देखील महत्व असते. आपण आपल्या जीवनात सौंदर्याचा शोध घेत असतो तेव्हा ते अधिकाधिक कसे मिळवता येईल ह्यासाठीच प्रयत्नशील असतो. सुंदरता, ही आपल्या प्रत्येक गोष्टीकडे बघण्याच्या दृष्टीकोनावर अवलंबून असते. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. प्रत्येक गोष्ट ही सुंदरच असते, अशा सकारात्मक दृष्टीने विचार, वर्तन आणि व्यवहार केल्यावर त्या गोष्टी मध्ये सौंदर्याचा साक्षात्कार व्हायला लागतो. आपल्या जीवनामधील सौंदर्याचे स्थान आणि महत्व हे तेव्हाच आपण अनुभवू शकतो. आनंद मिळवून जीवन जगण्यातच आपले मनःस्वास्थ्य टिकून राहू शकते. मानसिक स्वास्थ्य हे आपल्या भावनात्मक, कौटुंबिक आणि सामाजिक बाबींशी निगडीत असते. आपण कसा विचार करतो, अनुभवतो आणि कृती करतो? यावर ते अवलंबून असते. अनेकदा नकळत आपल्या अंतर्मनावर ताण येत असतो, तो जाणवत नाही आणि म्हणूनच कळतही नाही. अशावेळी आपल्या क्रिया आणि प्रतिक्रिया अनावधानाने बदलत जातात. त्यामुळे घेतलेले निर्णय आणि त्या दरम्यान इतरांशी होणारे आपले संवाद काहीवेळा विपरीत परिणाम करणारे ठरू शकतात. यासाठीच जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर अगदी बालपणापासून वृद्धार्पणापर्यंत मानसिक स्वास्थ्य महत्वाचे आहे. आपल्या जीवनात आपण मानसिक स्वास्थ्यविषयक समस्यांचा सामना करत असतो. त्यामुळे आपली विचारसरणी, अंतर्मनाची भावना आणि वागणूक ह्या सर्वांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## स्वार्थाचा सन्मान | करू नये ||

सारासार शुद्ध | करावा विचार ||
उगा व्याभिचार | करू नये ||१||

देहाचे चोचले | विनाशा कारण ||
आयुष्य तारण | ठेऊ नये ||२||

संगतिचे भान | ठेवा निरंतर ||
नामात अंतर | राहू नये ||३||

व्यासंगाशी संग | करावा सदैव ||
आणिकाशी भाव | देऊ नये ||४||

आपुल्या हीताचा | राखा स्वाभिमान ||
स्वार्थाचा सन्मान | करू नये ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी


## अंबाबाईस आवाहन

अंबे इतुके करावे। माझिया कथेसी यावे।।
आसनावरी बसावे। मानपान सारे घ्यावे।।
नमितो मी मनोभावे। मजमुखे त्वा वदावे।।
कथाप्रसंग बरवे। नवरसा ते साधावे।।
माधुर्य स्वयेची यावे। अखंडित ते असावे।
भावडोळां तू दिसावे। तुझे स्मरण होआवे।।
लतामंडप सजावे। भक्तीचे झरे वहावे।
शब्दधनु मज द्यावे। कल्पांती ते न सरावे।।
स्वरोद्यान गे फुलावे। शब्देविण संवादावे।
प्रसादासी सर्वे यावे। मनोरथ पूर्ण व्हावे।।
याचकांनी संतोषावे। वंचकांनी दूर जावे।
भाविकांनी नाम घ्यावे। कथागंधे दर्वळावे।।
जीवशिवे अभेदावे। उदो उदो ते करावे।
चन्द्रहास विनवे गे। रसवन्ती तू वसावे।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# ।। दासबोध स्तवन ।।



## अनिर्वाच्य निरुपण

आधुनिक केसरी

मित्रांनो समर्थ आपल्याला प्रत्येक शब्दाचा अर्थ आपल्या रोजच्या जीवनातील निगडीत गोष्टींची तुलना करून देतात. की आपल्याला ते सहज सोपे वाटावे. आता हे चं बघानां शब्द व अर्थ यांचा संबंध ते धान्या &भुसा(भुसकट)अशा स्वरूपात आपल्याला सांगतात. शब्द हे स्थुल आहेत तर अर्थ सुक्ष्म असतो. आपल्याला शब्दाचा अर्थ हवा असेल तर शब्दाचा वापर करतो.

आता हेच पहानां, अतिशय विचाराने भरलेले शब्द जरी बोलले तरी ते दिसतात, म्हणून ते मायेच्याच क्षेत्रातील असतात. ते असार &नाशवंत असतात. शब्दाच्या माध्यमातून अर्थ कळतो.शब्दाचा अर्थ सत्य व शाश्वत असतो. आपल्याला शब्दामुळेच ज्ञान मिळते. परंतु समर्थ काय सांगतात ते लक्ष देऊन ऐका बरं का! शब्दाचा जो अर्थ असतो तो सत्य &शाश्वत असतो. परंतु स्वतः शब्द मात्र असत्य व अशाश्वत असतो. ते कसे? वस्तूंचे दर्शन झाल्यावर शब्द आपोआप नाश पावतो. शब्द असार कवच असुन त्याचा अर्थ आतील भरीव सार असतो. पुढे समर्थ अगदी आपल्याला तत्वज्ञान सांगतात.

शेंगवर्गीय भाजीचे ऊदा,देतात. धान्य घ्यावे व भुसा किंवा फोलपट टाकून देतो त्याप्रमाणे शब्द व भूंस व अर्थ व अर्थ धान्य समजावे. पोकळ कवचात भरीव धान्य समजावे. पोकळ कवचामध्ये भरीव धान्य सापडते. त्याप्रमाणे धान्य निवडून परब्रम्ह रूपी अर्थ समजल्यावर फोलपट रूपी शब्द आपोआपच गळून पडतात. म्हणून आत्मसाक्षात्काराशी शब्द जाऊ शकत नाहीत. समर्थानी आपले भाषेचे तत्वज्ञान यात सांगितले आहे. आपली मराठी भाषा किती ज्ञानी आहे त्यासाठी 5 तत्वज्ञाच्या भाषा विषयक गोष्टी सांगितल्या आहेत.

1)भाषेचे प्रधान कार्य 2)शब्द &अर्थ यांचा संबंध
3)अर्थाचे स्वरूप काय. 4)अर्थ आणि सद्वस्तु यांचा संबंध काय
5)जे अनिर्वाच्य आहे ते भाषेत किती व कसे आणता येते.

भाषेला दोन अंगे असतात शब्दोच्चार हे भाषेचे बाह्यांग आणि शब्दांश हे भाषेचे अंतरंग आहे. तर शब्दसमुह हा वाच्यांश आहे. त्याची थोडक्यात फोड मी पुढील प्रमाणे करत आहे.**आपल्याशी कोणी बोलत आहे तेव्हा त्याचें शब्द ध्वनी रूपात आपल्या कानी पडत आहेत. हा झाला भाषेचा वाच्यांश. आता शब्द कानावर पडत असले तरी त्याचा मनाला काही तरी बोध होतो त्या बोधाला अर्थ म्हणतात. यालाभाषेचा लक्षांश म्हणतात. शब्दांचा संबंध शरीराशी तर अर्थाचा संबंध मनाशी अधिक असतो.संवादामध्ये शब्द गौण तर अर्थ प्रधान असतो. म्हणजे समर्थ भाषेचे तत्वज्ञान सांगतात की "वाच्यांश टाकावा लक्षांश समजून घ्यावा आणि त्याचें स्वानुभावात रूपांतर करावे.

**जय जय रघुवीर समर्थ।।**



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


# निष्ठा बलवत्तर असावी

आधुनिक केसरी

पोथीची समाप्ती झाली, म्हणजे ऐकण्याचे संपून कृतीत उतरण्याची वेळ आली असे समजावे. पोथी ऐकण्याचा मोबदला पुराणिकाला पैका दिल्याने मिळत नाही; तो असा असावा की दोघांचेही कल्याण होईल. भगवद्भक्ति करणे हा खरा मोबदला आहे.

जगात अशा कितीतरी गोष्टी आहेत की त्यांचे ज्ञान आपल्याला होत नाही; पण म्हणून काही आपण त्या खोट्या नाही मानीत. आपण आपल्या तुटपुंज्या ज्ञानाचाही अभिमान धरतो हे चुकते आपले. भगवंताने ज्ञान दिले, आणि आम्ही त्याचा अभिमान धरू लागलो, तर हातात तरवार दिल्यावर शत्रूचे शिर कापण्याऐवजी आपलीच मान तोडल्यासारखे झाले ! ज्या विद्येने स्वतःचे हित कळत नाही, ती विद्या नसून अविद्याच होय. जे खरे नाही ते खरे आहे असे वाटणे, हे अज्ञान होय. अविद्या आणि अज्ञान दोन्ही सारखेच. परमात्म्याच्या स्वरूपाविषयी आपण संशय घेतो हे आपले अज्ञानच होय. देव आपल्याला आणि आपल्या कृतीला पाहतो ही जाणीव असणे, म्हणजे ज्ञान होय.

प्रत्येकाला त्याची गरज भागेल एवढे भगवंत देतच असतो.



म्हणून आहे त्यात समाधान ठेवावे. ज्याचे समाधान भगवंतावर अवलंबून आहे त्याचे समाधान कोणत्याही परिस्थितीत टिकेल. आपली निष्ठा अशी बलवत्तर असावी की तिच्यामुळे आपले समाधान राहील. हरिश्चंद्र, प्रह्लाद, वगैरे मोठ मोठ्यांचा किती छळ झाला ! पण त्यांची निष्ठा अती बलवत्तर असल्याने ते त्या छळातून सुखरूप पार पडले. परिस्थिती सारखी बदलत असते; म्हणून जे फळ आपण आज मागतो ते बदललेल्या परिस्थितीत सुखाचे होईलच याची खात्री नाही. म्हणून जे फळ मिळेल त्यात समाधान मानावे. गीतेत असे सांगितले आहे की, सर्व धर्म सोडावेत पण भगवंताला शरण जावे; पण ते न करता आपण विषयालाच शरण जातो, त्याला काय करावे ? अर्जुनाने भगवंताला आपल्या बाजूला घेतले, आणि त्यामुळे पांडवांचे जे समाधान टिकले, ते काही कौरवांचे टिकले नाही. पांडवांनी देहाने वनवास सोसला; पण मनाने त्यांनी भगवंताला भजल्यामुळे वनवासातही ते समाधानात राहिले. भगवंताच्या इच्छेने सर्व होते आणि सर्व तोच करतो, अशी भावना ठेवणे यासारखे समाधान नाही. आनंद कृतीत आहे, फळाच्या आशेत नाही. नामस्मरण ही कृती केली तर शाश्वत आनंद आणि समाधान आपल्याला मिळाल्यावाचून राहणार नाही. जे घडते ते भगवंताच्या इच्छेने घडते अशा खऱ्या भावनेने एक वर्षभर जो राहील, त्याला समाधान हे काय आहे हे खात्रीने कळेल.

**बोधवचन :** नाम घेताना देवाला सांगावे , " प्रपंचातले काही मला देऊ नकोस , मला तुझे प्रेम दे ."

**-श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर**

# गरिबांची गाडगे बाबा धर्मशाळा 'राम भरोसे'; रुग्णांच्या लुटीची चौकशी गुलदस्त्यात

## शासकीय करार न करता अधिकारी आणि संचालकांची मिलीभगत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्री गाडगे महाराज मिशन मुंबई संचलित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे गरीब रुग्णासाठी 'ना नफा, ना तोटा' या तत्वावर धर्मशाळा चालवली जाते. परंतु येथील कर्मचारी अक्षरशः गरीब रुग्णांची खुलेआम लूट करीत असल्याची तक्रार थेट मुंबई संचालक कार्यालयाच्या आयुक्तांना करण्यात आली होती. तक्रारीच्या अनुषंगाने केलेली चौकशी गुलदस्त्यात असून गेल्या वर्षभरापासून कोणताही शासनकीय करार न करता धर्मशाळा रामभरोसे सूरू आहे.यामुळे शासनाचा निधी बुडत आहे.




**असे आहे करारात निश्चित केलेले दर ...**
१) जनरल वॉर्डात नातेवाईकांना १० रुपये प्रतिदिन
२) खोली करीता ६० रुपये इतके शुल्क
३) विशेष खोलीकरीता ८५ रुपये, यात संडास, बाथरुम अटॅच.

**असे आहे अतिरिक्त घेण्यात येणारे दर**
१) १० रुपये रुम, २० रुपये गादी, १० रुपये पलंग
२) ६० आणि ८५ रुपये रुमसाठी पैसे व अतिरिक्त २० रुपये गादी, गरमपाणी १० रुपये आदी पैशांची वसुली.

### थेट प्रश्न

**(एस. के. केदार, बांधकाम विभाग घाटी)**

**धर्मशाळे सोबत करार केला आहे का?**
नाही, त्यांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

**मुदत संपल्यानंतरही धर्मशाळा कशी सूरू आहे?**
हा निणर्य वरिष्ठ कार्यालयाकडून घेतला जातो, मला सांगता येणार नाही.

**रुग्णांच्या लुटी बाबत चौकशीचे काय झाले?**
आम्ही तक्रार प्राप्त झाल्यानंतर १२ सदस्यांनी चौकशी समिती नमेली होती. याचा अहवाल मुंबई कार्यालयाला पाढवला आहे. पुढील निर्णय ते घेतील.

**काय आहे प्रकरण :** श्री गाडगे महाराज मिशन मुंबई यांच्या सोबत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय घाटी यांनी डिसेंबर २०२१ पर्यंत धर्मशाळेचा करार केला होता. कॅन्सर हॉस्पीटल आणि घाटीत जिल्ह्यासह इतरही जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात रुग्ण येतात. त्याना महिना महिना उपचार करण्यासाठी थांबावे लागते. असे रुग्ण आणि नातेवाईकांची सोय व्हावी म्हणून ना नफा, ना तोटा या तत्वावर श्री गाडगे बाबा धर्मशाळेच्या वतीने येथे गरीब रुग्णासाठी स्वस्त दरात रुम, जेवणांची सोय केली जाते. परंतु या चांगल्या योजनेची धर्मशाळेतील काही कर्मचाऱ्यांनी वाट लावली होती. कराराप्रमाणे नाममात्र शुल्क घेण्याऐवजी रुग्णांकडून अतिरिक्त पैसे उकळले जात होते. या प्रकरणची आयुक्त मुंबई याना तक्रार केल्यानंतर चौकशी लावण्यात आली होती. दरम्यान या चौकशीचा अहवाल गुलदस्य्यात असून अनधिकृत पणे करार न करता धर्मशाळा सुरु आहे.

**अशी झाली चौकशी :** नोव्हेंबर २०२१ मध्ये धर्मशाळेत काम करणारे आचारी व मॅनेजर हे रुग्णांच्या नातेवाईकांकडून अतिरिक्त शुल्क आकारत होते. याप्रकरणी तक्रार झाल्यानंतर प्राथमिक चौकशी करण्यात आली. सुरूवातीना तेथील आचाऱ्याची बदली करण्यात आली होती. नंतर चौकशी समिती स्थापन करुन करार थांबवण्यात आला होता. दरम्यान चौकशी प्रलंबित असल्याने तीन महिन्याची मुदत धर्मशाळेला देण्यात आली होती. आता करार आणि मुदत संपली असताना धर्मशाळा सूरू आहे. घाटी आणि धर्मशाळेच्या अधिकाऱ्यांच्या मिलीभगतीमुळे सध्या धर्मशाळा अनधिकृत पध्दतीने सुरु आहे.

या संदर्भात घाटी अधिष्ठाता एस. पी. रोटे व गाडगे बाब धर्मशाळा संचालक यांच्याशी संपर्क करण्या प्रयत्न केला असता ते उपलब्ध होऊ शकले नाही. त्यामुळे त्यांची बाजू समजू शकली नाही.

# दिवाळीच्या तोंडावर एसटी प्रवास महागणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महसूल वाढीच्या दृष्टीने एसटी महामंडळाकडून प्रवास भाड्यात 5 ते 75 रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. ही वाढ हंगामी असून दिवाळीच्या दरम्यान महसूल वाढीसाठी हा निर्णय घेण्यात आल्याच महामंडळाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. 20 ऑक्टोबर ते 31 ऑक्टोबर या दरम्यान, केवळ दिवाळीच्या कालावधीसाठी एसटी प्रवास भाडेवाढ करण्यात येणार आहे. शिवनेरी आणि अश्वमेध या बसेसला ही भाडेवाड लागू राहणार नाही. एसटी महामंडळाकडून करण्यात आलेली ही भाडेवाढ केवळ दहा दिवसांसाठी आहे. ही दरवाढ साधी (परिवर्तन), निमआराम (हिरकणी), शिवशाही (आसन) आणि एसी बसेसला लागू राहील. शिवनेरी आणि अश्वमेध या बसेसला ही भाडेवाड लागू राहणार नाही. आरक्षण केलेल्या प्रवाशांना फरक द्यावा लागेल ज्या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केले आहे त्या प्रवाशांकडून आरक्षण तिकीट दर आणि नवीन तिकीट दर यातील फरक घेण्यात येईल.

# वीज पडून शेतकऱ्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** तालुक्यातील सरफगव्हान येथील शेतकऱ्याचा वीज पडून मृत्यू झाला आहे. आज शुक्रवारी तुकाराम काळे (वय 45) हे शेतात पीक पाहण्यासाठी गेले होते. दुपारी 12 वाजेच्या सुमारास त्यांचावर वीज कोसळली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुख:तू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# सत्ता गेली तरी आपले सत्व शाबूत आहे, त्यामुळे आपण पुन्हा सत्तेत येऊ

## जयंत पाटील : जळगाव शहर व जिल्हा कार्यकारिणी आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** आपली सत्ता गेली तरी सत्व आपले शाबूत आहे. आपण स्वाभिमान जपला म्हणून आपण ताठ मानेने लोकांच्या समोर जावू शकतो. त्यामुळे लोकांपर्यंत जा... येत्या दीड - दोन वर्षात निवडणुका लागतील. आपण लोकांच्या आशीर्वादाने पुन्हा सत्तेत येवू अशी खात्री राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी व्यक्त केली. जळगाव शहर व जिल्हयाचा आढावा प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज घेतला. महाराष्ट्रातील युवक सरकारवर नाराज आहेत. फॉक्सकॉन प्रकल्प सरकारच्या हातून गेला आणि तरुणांच्या हातून रोजगारही गेला. केंद्रसरकारनेही रोजगाराची निर्मिती केली नाही, त्यामुळे देशभरात बेरोजगारीची संख्या वाढली, महागाई वाढली आहे. लोकांना बोलू देत नाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली जात आहे. लोक आपल्याला भरभरून देण्याच्या तयारीत आहेत. आपण आपला पदर मोठा करायला हवा. संघटना मोठी झाली, सभासद नोंदणी चांगली झाली तर ते शक्य होईल असेही जयंत पाटील यावेळी म्हणाले. प्रत्येकाने पक्ष वाढवण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. जास्तीत जास्त कार्यशील सदस्यांची नोंद कशी होईल यासाठी प्रयत्न करायला हवा. लोक १० रुपयाची पावती फाडतात आणि मनाने काम करतात अशा लोकांपर्यंत पोहोचा आणि सभासद नोंदणी यशस्वी करा. निवडणुकांसाठी फार कमी अवधी राहिला आहे. आपण सध्या सरकारमध्ये नाही याची कल्पना आहे पण या वेळेत आपण जास्तीत जास्त लोकांकडे पोहोचू याचा मला विश्वास आहे. जो जास्त काम करेल त्यालाच पक्षात स्थान दिले जाईल. त्यामुळे प्रामाणिकपणे सभासद नोंदणी करा. या मोहिमेत मला थोडाही ढिसाळपणा चालणार नाही, सर्वांनी यात उत्साहाने सहभागी व्हा असे आवाहनही जयंत पाटील यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले. यावेळी माजी मंत्री आमदार एकनाथ खडसे, माजी मंत्री गुलाबराव देवकर, माजी विधानसभा अध्यक्ष अरुणभाई गुजराथी, जिल्हाध्यक्ष रविंद्र भैय्या पाटील, माजी आमदार सतिश पाटील, माजी आमदार राजीव देशमुख, माजी आमदार दिलीप वाघ, रोहिणीताई खडसे, महिला जिल्हाध्यक्ष वंदना चौधरी, युवक जिल्हाध्यक्ष रविंद्र नाना पाटील आदींसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# अविनाश परदेशी खूनप्रकरणी अखेर १० जणांवर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** धुळ्यातील देवपुरात राहणाऱ्या अविनाश बन्सीलाल परदेशी याचा मृत्यू अपघातामुळे तर घातपातामुळे झाल्याचे पोलीस तपासात पुढे आले आहे. त्यानुसार पोलिसांनी या गुन्ह्यात आता सागर कांबळेसह दहा जणांवर खूनासह दंगलीचे बाढीव कलम लावले आहे. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये मृत अविनाशने सागरसह दहा जणांची नावे घेतली होती तसेच शवविच्छेदन अहवालातही मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. त्यानुसार ही वाढीव कलमे लावण्यात आली आहेत. देवपूरातील विट भट्टी परिसरात राहणारा अविनाश परदेशी या तरुणाने दि. २४ सप्टेंबर रोजी रात्री १२.११ वाजेच्या सुमारास पश्चिम देवपूर पोलिसांना दिलेल्या जबाबावरून अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या जबाबात त्याने म्हटले होते की, दि २१ सप्टेंबर रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास गांव गावाच्या शिवारातील अजमेरा पेट्रोल पंपाच्या दक्षिणेस मुंबई - आग्रा महामार्गाच्या पश्चिम दिशेला असलेल्या सर्विस रोडवर अज्ञात स्कार्पिओ वाहनावरील चालकाने अविनाशच्या मोटारसायकलला जोरदार धडक मारुन त्यास जखमी करुन पसार झाला. त्यानुसार स्कार्पिओवरील अज्ञात चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. अविनाशचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. गत बुधवारी त्याच्यावर अंत्यसंस्कार आटोपल्यानंतर त्याच्या काही साथीदारांनी व प्रत्यक्ष साक्षीदाराने अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव यांची भेट घेवून हा अपघात नसून घातपात असल्याचे पुराव्यानिशी सांगितले. याबाबतचा व्हिडीओ देखील दाखविला. त्यात अविनाश हा जखमी अवस्थेत असून तो सागर कांबळेसह काही जणांची नावे घेत असल्याचे दिसत होते. त्यानुसार प्रशांत बच्छाव यांनी पश्चिम देवपूर पोलीस ठाण्याचे सपोनि सचिन बेंद्रे यांना खूनाचा गुन्हा दाखल करून घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने सपोनि बेंद्रे यांनी या घटनेची सखोल चौकशी केली. त्यात अविनाशच्या अंगावरील जखमा या अपघाताच्या नसून मारहाणीच्या असल्याचेही शवविच्छेदन अहवालातून समोर आले आहे. त्यानुसार बेंद्रे यांनी अपघाताच्या दाखल गुन्ह्यात सागर कांबळेसह लखन लोणारी, प्रफुल्ल उर्फ भैय्या भोई, अजय कांबळे, शुभम देशमुख, शुभम भामरे, अमोल मराठे, राजेश जाधव, संजय माळी, अविनाश चव्हाण या दहा जणांविरुध्द खूनाच्या कलमासह दंगल व मारहाणीचे कलम वाढदिले आहेत.

# केजरीवाल संतापले

आधुनिक केसरी



गुजरातमध्ये सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या राज्यात भाजपाला आव्हान देण्यासाठी आम आदमी पक्षाने कंबर कसली आहे. त्यातच गुजरातमध्ये पराठ्यांवर १८ टक्के जीएसटी लावल्यानंतर भडकलेले आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी भाजपाचा समाचार घेतला आहे. ब्रिटिशांनी सुद्धा खाद्यपदार्थांवर कर लावला नव्हता, असे म्हणत केजरीवाल यांनी भाजपा सरकारला फटकारले आहे. केंद्र सरकारकडून आकारला जाणारा जास्त जीएसटी देशातील महागाईचे मुख्य कारण आहे. हा जीएसटी कमी करून जनतेची महागाईतून सुटका करण्यात यावी", असे केजरीवाल यांनी म्हटले आहे. 'गुजरात अॅपीलेट अॅथॉरिटी ऑफ अडवाँस रुलिंग'ने गुरुवारी पराठ्यांवरील १८ टक्के जीएसटी मंजूर केला आहे. 'जीएएआर'च्या विवेक रंजन आणि मिलिंद तोरावणे यांच्या दोन सदस्यीय खंडपीठाने पराठे साधी चपाती किंवा पोळीपासून वेगळे असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे पराठे चपात्यांच्या श्रेणीत मोडले जात नसल्याचे सांगत यावर १८ टक्के जीएसटी लागू करण्यात आला आहे. अहमदाबादेतील 'वाडीलाल इंडस्ट्रीज' या कंपनीने पराठ्यांवरील १८ टक्के जीएसटी कमी करण्याबाबत याचिका दाखल केली होती. ही कंपनी आठ प्रकारचे फ्रोजन पराठे तयार करते. चपाती आणि पराठे दोन्ही पिठापासून तयार होत असल्याने यात जास्त अंतर नसल्याचे मत कंपनीने नोंदवले होते. त्यामुळे पराठ्यांवर १८ टक्क्यांऐवजी पाच टक्के जीएसटी आकारण्यात यावा, अशी मागणी कंपनीकडून करण्यात आली होती. मात्र, 'जीएएआर'ने कंपनीची मागणी फेटाळत पराठ्यांवर १८ टक्के जीएसटी कायम ठेवला आहे. अनेक प्रकारच्या पराठ्यांमध्ये गव्हाचे पीठ हा सामान्य घटक असतो. मात्र, या पराठ्यांमध्ये पाणी, खाद्यतेल, मीठ, बटाटे, भाज्या, मुळा, कांदे, मेठी यासह इतरही घटक असतात. या घटकांचा विचार करता चपाती किंवा पोळी आणि पराठे खूप वेगळे पदार्थ आहेत, असे 'जीएएआर'ने म्हटले आहे.

# प्रज्ञावंत प्रेषित : डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**जगप्रसिद्ध नाटककार विल्यम शेक्सपिअर म्हणतो, "काही माणसं जन्मताच महान असतात, काही कठीण परिश्रमाने महानता प्राप्त करतात आणि काहींवर महानता लादली जाते." या व्यक्तीमत्वापैकी पहिल्या आणि दुसऱ्या वर्गात बसणारे व्यक्तिमत्व म्हणजे भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम! आधुनिक भारताच्या इतिहासात भारतीय तरुण-मध्यमवर्ग-बुजुर्ग स्त्री-पुरुषांच्या मनावर सर्वार्थाने अधिराज्य गाजवणारी व्यक्तिमत्व दुर्मिळच! अशाच प्रकारच्या व्यक्तीमत्वांपैकी वीस-एकविसाव्या शतकांतील महान व्यक्तिमत्व म्हणजेच डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम! जवळपास ८३ वर्षे त्यागपूर्ण आयुष्य जगलेले गुरुवर्य डॉ. कलामांचा जीवनपट सर्वांनाच थक्क करणारा आहे!**

जेमतेम आर्थिक परिस्थिती असलेल्या मुस्लीम कुटुंबात जन्मलेले कलाम म्हणजे चार मुले आणि एका मुलीच्या आई-वडिलांचे शेंडेफळ! वडील एका मशिदीचे इमाम आणि  रामेश्वरम ते धनुषकोडी दरम्यानभक्तांची ने-आण करणारे नावाडी. लहानपणापासूनच घरात धर्मसहीष्णू वातावरण होते. याचा परिपाक म्हणजे कलाम एकाचवेळी मशिदीत आणि रामेश्वरमच्या मंदिरात जायचे असा उल्लेख त्यांनी 'अग्निपंख' आत्मचरित्रात केला आहे. घरची जेमतेम परिस्थितीमुळे कलामांनी आपल्या भावाला वर्तमानपत्र वाटायला मदत केली. भरधाव धावणाऱ्या रेल्वेतून पडणारे वर्तमानपत्रांचे गठ्ठे तरुण कलाम जमा करायचे आणि वाटप करायचे. अत्यंत खडतर परिस्थितीत शिक्षण घेतांना त्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागला. कलामांना फायटर पायलट व्हायचे होते परंतु त्यांचे पायलट होण्याचे स्वप्न अधुरे राहिले! मात्र कलामांनी आपलं प्रयत्नांचे शस्त्र म्यान केले नाही. याचाच परिपाक म्हणजे आय.आय.टी मद्रास येथून पदवी पूर्ण झाल्यानंतर डी.आर.डी.एस. मध्ये त्यांची निवड झाली आणि त्यानंतर मात्र त्यांनी मागे वळून पहिलेच नाही!
त्यानंतर त्यांच्या संशोधनाचे विमान सुसाट सुटले. त्यांनी सुरुवातीला एक छोटेसे हॉवरक्राफ्ट डिझाईनकरून आपल्या संशोधन कार्याची चुणूक दाखवून दिली. त्यानंतर डॉ.विक्रम साराभाई, डॉ.ब्रह्मप्रकाश यांच्या मार्गदर्शनात एकावर एक यशाची शिखरे पादाक्रांत करत त्यांनी भारतीय बनावटीचे मिसाईल बनवण्याचे तंत्रज्ञान अंगीकृत करून नव्या भारताच्या संशोधन क्षेत्रात मोठी भरारी घेतली! डीआरडीओ आणि इस्रो सारख्या अत्यंत महत्वपूर्ण आणि जबाबदारीच्या अंतराळ विषयक संशोधन संस्थांमध्ये काम करतांना अनेक मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा लाभ त्यांना झाला. त्याचबरोबर या संस्थांचे संचालक म्हणून काम पाहतांना नव्या पिढीतील अनेक संशोधकांना घडवण्यात डॉ.एपीजे अब्दुल कलामांचा सिंहाचा वाटा आहे. जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्र विकसित करण्यामध्ये डॉ.कलामांची अत्यंत मोलाची भूमिका राहिली आहे. अणुस्फोट असो की क्षेपणास्त्र प्रक्षेपण, डॉ.कलामांनी देशाच्या संरक्षण कार्यात मोलाचे योगदान दिले आहे! भारतीय बनावटीचे पीएसएलव्ही आणि आयजीएमडीपी तंत्रज्ञान विकसित करून भारतीय बनावटीचे क्षेपणास्त्र बनविण्याचे संपूर्ण श्रेय डॉ.कलामांना जाते. त्याचबरोबर आण्विक चाचण्या करण्यासाठी देशाच्या पंतप्रधानाचा विश्वास संपादन करून भारताला जगात अण्वस्त्रधारी देश म्हणून ओळख निर्माण करून देण्याचे काम डॉ.कलामांनी केले हे ही दुर्लक्षून चालणार नाही!
रात्रीचा दिवस करून डॉ.कलाम प्रयोग शाळेत संशोधन



कार्यात इतके मग्न असायचे की; अक्षरशः त्यांना त्यांच्या निकाहाची सुद्धा आठवण राहिली नाही आणि नंतर मात्र ते आजीवन अविवाहितच राहिले. वयाच्या साठाव्या वर्षी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा अर्ज केला असता पंतप्रधान श्री नृसिंहराव यांनी आणखी दोन वर्षे देशसेवा करण्याची विनंती केली आणि प्रधानमंत्र्यांचे संरक्षण सल्लागार म्हणून त्यांनी उत्कृष्ट कार्य केले. वेळेचे बंधन न पाळता अहोरात्र काम करण्याच्या आणि संशोधन क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावत असल्यामुळे डॉ.एपीजे अब्दुल कलाम संपूर्ण देशभर एक वैज्ञानिक आणिमिसाइल मॅन म्हणून ओळखले जाऊ लागले. याचाच परिणाम म्हणजे डॉ.कलामांना २००२ साली केंद्रात एनडीएचे सरकार असतांना सरकारने त्यांना भारताचे ११ वे राष्ट्रपती होण्याची विनंती केली आणि त्यांनी ती मान्य केली. डॉ.एपीजे अब्दुल कलामांचा राष्ट्रपती कालखंड कायम चर्चेत राहिला. राष्ट्रपती असतांना डॉ.कलाम सातत्याने विद्यार्थी, युवक, सामान्य जनतेशी संवाद साधण्यासाठी त्यांनी भारतभर भ्रमंती केली. विशेषतः त्यांनी बालक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. हे बालक आणि युवकच उद्याच्या भारताचे आधारस्तंभ असून कुटुंब आणि शासनाने युवा पिढीच्या जडणघडणीची काळजी घ्यावी. बालक आणि तरुणांचे व्यवस्थित शारीरिक आणि बौद्धिक संगोपन होणे गरजेचे असून यांना विकसित देशाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तयार करण्याची जबाबदारी प्रत्येकाची असल्याचे त्यांनी वारंवार प्रतिपादन केले. प्रज्वलित मने या पुस्तकात त्यांनी एका लहान मुलीने, "मला विकसित भारतात रहायला आवडेल असे प्रतिपादन केले आहे."
त्याचबरोबर शिक्षण, गरिबी, आरोग्य यावर सुद्धा कलामांनी राष्ट्रपती असतांना केंद्र सरकारला निर्देश देऊन माहिती तंत्रज्ञानाचा प्रचार-प्रसार करण्याचे सुचविले. त्यामुळे ते "पीपल्स प्रेसिडेंट" म्हणून ओळखले जाऊ लागले!
भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम हे एक वैज्ञानिक, इंजिनिअर, मिसाइल मॅन, वक्ता, शिक्षक, कवी आणि प्रेरणादायी लेखक म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत.
त्यांच्याअग्निपंखया छोट्याशा आत्मचरित्राने तरुण, शिक्षक, लेखकांना प्रचंड उर्जा देण्याचे महत्कार्य केले. अल्पावधीतच त्यांचे आत्मचरित्र घराघरांत पोहोचले. याचबरोबरप्रज्वलित मने, मिशन इंडिया, टर्निंगपॉइंट्स,  टार्गेटथ्री बिलियन, माय जर्नी, ए मॅनिफेस्टो फॉर चेंज, फोर्ज युवर फ्युचर, अडवांटेज इंडियायासारखी प्रेरणादायी आणि देशाच्या विकासाला दिशा देणारी पुस्तके लिहून त्यांनी आपले सर्वांगीण योगदान अधोरेखित केले आहे.
"वीर ओळखावा रणी आणि साधू ओळखावा मरणी" या सुविचाराप्रमाणे डॉ.कलामांनी, 'आपण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतांना आपल्याला मृत्यु यावा' अशी इच्छा एका भाषणात बोलून दाखविली होती. अगदी तसेच, वयाच्या ८३ व्या वर्षी शिलांग येथील आयआयटी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतांना डॉ.कलमांची प्राणज्योत मालवली! एक सच्चा शिक्षक, महान देशभक्त, प्रेरणादायी वक्ता, प्रेमळ हृदयी कवी, मातृ-पितृभक्त, लेखक डॉ.एपीजे अब्दुल कलामांसारख्या व्यक्तीला आपण पारखे झालो! कलामांच्या आठवणीत एक हिंदी कवी

**वो एक ऐसा अजीब शक्स था**
**जो इन्सानियत की मिसाल था**
**वो सिर्फ एक नाम कलाम नही**
**बल्की वो खुदा का कमाल था**

या ओळी लिहून त्यांचे अमरत्व अधोरखित करतो आहे!
आज आपण सर्वांनी त्यांचे महान कार्य, देशभक्ती, संशोधन, धर्म सहिष्णुता, देशप्रेम, विद्यार्थीप्रेम, एक सच्चा शिक्षक, प्रेमळ माणूस इत्यादी प्रेषितांचे सद्‌गुण असणारी व्यक्ती आपला आदर्श असली पाहिजे! छत्रपती शिवराय, स्वामी विवेकानंद, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांनाच आदर्श ठेवून आपल्याला चालावे लागेल. या महान लोकांच्या पाऊलखुणा आदर्श ठेवाव्या लागतील! अंधश्रध्दा, असहिष्णुता, कट्टरता, व्यसनाधीनता, अजिज्ञासूवृत्ती, आततायीपणा इत्यादी दुष्प्रवृत्तीनी नव्या पिढीला विळखा घातला आहे. ही उद्याच्या भारतासाठी धोक्याची घंटा आहे! रात्र वैऱ्याची आहे! हे सर्व थांबण्यासाठी शिक्षक-प्राध्यापक-विद्यार्थी-समाजसुधारक-राजकारणी या सर्वांनी डोळ्यांत तेल घालून या महान लोकांच्या आदर्शावर चालावे लागेल! असे झाल्यासच खऱ्या अर्थाने भारत देश आपल्या स्वातंत्र्याचे शतक सन्मानाने साजरा करेल! तेंव्हा चला, डॉ.कलामांच्या जयंतीदिनी नवा, स्वावलंबी, सहिष्णू, प्रज्ञावंत भारत घडविण्याचा संकल्प करूयात! जय हिंद! जय भारत!

# सरकारने प्राथमिक शाळा बंद करायला नकोत



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा विकास आहे. शिक्षण म्हणजे प्रकाश, दूरदृष्टी, समजून घेणे आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणामुळे उत्कृष्ट नागरिक घडून देशाचा राष्ट्राचा विकास साधता येतो. त्यामुळे शासनाने या सर्व गोष्टीचा आणि खेड्यापाड्यातील शेतकरी, शेतमजूर, गरीब, दलित, आदिवासी, भटका व इतर सर्वांचा आणि त्यांच्या परिस्थितीचा विचार करून त्यांच्या जीवनाशी न खेळता जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा बंद करु नयेत.तो निर्णय मागे घेऊन देशहित, राष्ट्रहित साधने गरजेचे आहे.**

शासनाने जि.प. प्राथमिक शाळा पटसंखेचे कारण दाखवून बंद करण्याचा निर्णय घेऊन गोरगरीब माणसांच्या जीवावर प्रहार केला आहे. तो निर्णय अत्यंत चुकीचा वाटतो आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तर वर्ष पूर्ण झाली तरी शिक्षण अजून झोपडीपर्यंत, वाड्या वस्तीवर, पाड्यावर नीटसे मनावे तेवढे पोहोचले नाही. शिक्षणाचा खरा फायदा अजूनही गरिबांना मिळाला नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यात पटसंख्या कमी असणाऱ्या शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. आता कुठेतरी बहुजन समाजातल्या मुलांना शिक्षणाची गोडी लागायला लागली होती. खरे तर या देशात अगोदर चातुर्वर्णव्यवस्था असल्यामुळे शिक्षणाचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच होता. इतर कुणालाही नव्हता. त्यामुळे कित्येक वर्ष बहुजन समाज अज्ञानात डुंबून गेला होता. शिक्षणापासून वंचित होता. इंग्रज या देशात आले आणि त्यांनी सगळ्यांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्यांच्याकडे कुठलीही विषमता नव्हती. भारतीय त्यांच्या शाळेत जाऊ लागले. शिक्षणाने प्रगल्भ होऊन शिक्षणाचे महत्त्व ते इतरांना सांगू लागले.म. फुले यांनीही अस्पृश्यासाठी शाळा काढून खूप मेहनत घेतली. राजर्षी शाहू महाराजांनी तर प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहून सर्वांना शिक्षण घेण्याचा अधिकार मिळवून दिला. स्वातंत्र्यानंतर शिक्षणामुळे अनेक बदल झाले. देशाचा, राष्ट्राचा विकास साधता आला. स्वातंत्र्यानंतर गाव तिथे शाळा, प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत, सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत मार्फत शिक्षण व्यवस्था राबविण्यात येऊ लागली. अंगणवाडया तयार केल्या. कोठारी आयोग, राधाकृष्ण आयोग व विविध शैक्षणिक धोरण राबवून शिक्षणामध्ये अमुलाग्र बदल करण्याचा प्रयत्न केला परंतु आज मात्र शिक्षण



व्यवस्थेचे फार धिंडवडे उडताना दिसत आहेत. शिक्षण व्यवस्था खिळखिळी करून सर्वसामान्यांना अज्ञानात टाकण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. शाळेत जाण्याविषयीची विद्यार्थ्यांना गोडी लागावी आशा शाळा गावातून दुरापस्त होताना दिसत आहेत. त्यांच्या जीवनाशी सरकार खेळत आहे. हे वाईट आहे. अजूनही अनेक खेड्यापाड्यात गरीबी, दारिद्र्य जीवघेणे तसेच आहे. अनेकांना रोजगार मिळत नाही. ऊसतोड मजुरांना तर पोटाचा प्रश्न आहे. अशांच्या मुलाच्या भवितव्याचे काय होणार? हा प्रश्न सतावत आहे. प्राथमिक शाळा म्हणजे जीवनाचा पाया असतो. संस्कार करण्याचे कार्य याच शाळेत केले जाते. तेच वेळेवर मिळाले नाही तर गरीब काय करणार? गरिबांना खेड्यातील, आदिवासी पाड्यावरील लोकांना दोन वेळेस चे अन्न मिळेनासे झाले आहे. अशी माणसे कुठे आपली मुले दुसरीकडे शाळेत घालणार? कुठेच नाही ते शाळेला मुकणार. आज शासनाने आपल्या जवळच्या राजकारणांना खाजगी शाळा, इंग्रजी शाळा, कॉलेज यांच्या खैराती वाटून टाकल्या आहेत. संस्थाचालकांनी पैसे घेऊन गुणवत्तेची वाट लावून टाकली आहे. शासनाचेही शैक्षणिक धोरण बदलत आहेत. त्यात पुन्हा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा बंद करण्याचा घाट घातला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात गरिबांच्या जीवनावर हे एक फार मोठे संकट आले आहे. आधीच देशात महागाई,भ्रष्टाचार, बेरोजगारी, धर्मांधता,जातीयता, अंधश्रद्धा, खाजगीकरण अशा अनेक समस्यांनी डोके वर काढले आहे. त्याकडे मात्र डोळे झाक केले जात आहे. त्यात पुन्हा या प्राथमिक शाळा बंद होणार या समस्यांनी लोक चक्रावून गेले आहेत. अस्थिर झाले आहेत. सरकार पुन्हा चातुरवर्णव्यवस्था आणू पाहते की काय अशा प्रकारचा प्रश्न पडत आहे. म.फुलेंच्या मतानुसार विद्याविना मती गेली... एवढे अनर्थ एका  अविद्याने केले.. अगदी त्याच दिशेने सरकारची वाटचाल दिसत आहे. गरिबांना खचून टाकत आहे.बड्या उद्योग समूहांनी खाजगी शिक्षण व्यवस्थेत रस दाखवला आहे. शिक्षण क्षेत्रात व्यापारी वृत्ती वाढत आहे. खाजगी शाळेचे पेव फुटले आहे. खरे तर हे शिक्षणव्यवस्थेचे,शासनाचे अपयश आहे. त्यातही फक्त श्रीमंताची पैशावालेच मुले शिक्षण घेत आहेत. तिथेही गरिबांची मुले फी विना मागेच पडत आहेत. म्हणजे शिक्षणापासून वंचित राहत आहेत. पुन्हा आता जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा बंद होणार ?गरिबांची मुले शिक्षणापासून वंचित राहणार? शासनाने इकडे वेळीच लक्ष द्यायला हवे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मुलांवर वाचन संस्काराची आवश्यकता



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**कुंभार ज्याप्रमाणे ओल्या मातीला हवा तसा आकार देऊन मूर्ती घडवितो त्याप्रमाणे बालसुलभ मनावर वाचन रूपी संस्काराचे सिंचन करून संस्कारक्षम व जबाबदार पिढी घडविणे शक्य आहे यावर प्राध्यापक सावरकरांचा केवळ विश्वासच नव्हे तर जवळपास दहा हजार विद्यार्थ्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचला असून पुस्तक दोस्ती या संवाद रुपी शिबिरातून मुलांना वाचनाची गोडी लागून ते आता त्यावर बोलू लागले आहेत.**

आजच्या मोबाईलच्या इंटरनेटच्या युगात मुलांचे वाचन लोप पावत आहे वाचन संस्कृती लयाला गेली आहे अशी वाक्य कानावर पडत असतांनाच नव्या पिढीला वाचनाची गोडी लावण्यासाठी अविरत झटणारे मराठी विषयाचे शिक्षक सचिन सावरकर यांनी पुस्तक दोस्ती चळवळ विदर्भात सर्वदूर पोचवली आहे.

'घडवाया या नव्या पिढीला' या ध्येयाने प्रत्येक रविवारी विदर्भातल्या खेडेगावात जाऊन गोष्टी रुपी पुस्तकांच्या माध्यमातून वाचन संस्कारासाठी प्रबोधन करीत सचिन सावरकर फिरत असतात..

सर्व सामान्य परिस्थितीतून अडचणींशी संघर्ष करीत शिक्षण घेत शिक्षकाची नोकरी स्विकारली. सचिन सावरकरांनी समाजात तरुण पिढी घडावी याकरिता सात ते वीस वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी एक उपक्रम सुरू केला त्या उपक्रमाचे नाव ठेवले पुस्तक दोस्ती.

कुंभार ज्याप्रमाणे ओल्या मातीला हवा तसा आकार देऊन मूर्ती घडवितो त्याप्रमाणे बालसुलभ मनावर वाचन रूपी संस्काराचे सिंचन करून संस्कारक्षम व जबाबदार पिढी घडविणे शक्य आहे यावर प्राध्यापक सावरकरांचा केवळ विश्वासच नव्हे तर जवळपास दहा हजार विद्यार्थ्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचला असून पुस्तक दोस्ती या संवाद रुपी शिबिरातून मुलांना वाचनाची गोडी लागून ते आता त्यावर बोलू लागले आहेत.

आजचा विद्यार्थी हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे तो देशाचा भावी आधारस्तंभ आहे. जीवन शिक्षणाची व्यापक शिदोरी आधुनिक काळात त्याच्याजवळ देणे अपरिहार्य असताना याबाबत पालकांची व समाजातील सुज्ञ घटकांची उदासीनता चिंतेची बाब आहे म्हणावे लागते. आज प्रत्येकाच्या घरात अनेक मनोरंजनाची साधने आहेत या मनोरंजनाला मात्र प्रबोधनाची जोड नसल्याने दररोज समाजमन सुन्न करणाऱ्या अप्रिय घटना वर्तमानपत्रात वाचायला मिळतात.

एखादा छोटासा उपक्रम जिद्दीच्या आणि कायम सातत्य ठेवून समाजाला कशी दिशा देऊ शकतो हे पुस्तक दोस्ती चळवळीतून दिसून येते. आयुष्याच्या या टप्प्यात मूल्य शिक्षणाचे धडे गिरवून याकरिता ज्या वयात हाती पुस्तक पाहिजे त्या वयात नासमज मनावर अक्षरशः अत्याचार करणारा मोबाईल असतो अशा काळात मनाला वाचनाची आवड लावून अंत :प्रेरणा जागृत करण्याचे अभिनव कार्य पुस्तक दोस्ती चळवळ करीत आहे. पुस्तक दोस्ती सोबतच प्रदूषणाबाबत जनजागृती व्हावी म्हणून दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये मुलांना घरोघरी सोबत नेऊन दिवाळीत मर्यादित फटाके फोडून बालकांनी पुस्तकांशी दोस्ती करण्याचे सचिन सावरकर आवाहन करतात. पंधरा ते वीस दिवसांच्या सुट्ट्या असलेला दिवाळीचा सण मागील दहा वर्षापासून घरोघरी पुस्तके वाटून अनोख्या पद्धतीने साजरा करीत आहेत. आपल्या मिळकतीचा काही वाटा प्रत्येक महिन्याला राखून ठेवत छोटी-छोटी बालकांना वाचण्याजोगी पुस्तके खरेदी करून सचिन सावरकर आपल्या संवेदनशील सहकारी विवेक महाजन, शैलेश जाधव ,वैभव भुरे, प्रतीक मुंजेवार ,प्रमोद राऊत, अनिता जाधव, शितल सावरकर ,फरीन शेख ,आदींना घेऊन पुस्तके वाटपाची ही मोहीम सकाळपासूनच सुरू करतात घरो घरी जाऊन पुस्तके देण्याच्या या अनोख्या उपक्रमामुळे पालकांशी संवाद साधण्याची संधी मिळते. आपण आपल्या मुलांना वाचनाचे महत्त्व कसे सांगावे व मोबाईलचा वापर कसा टाळावा याबाबत पालकांना प्रबोधन करतात. बालकांना दिलेल्या चरित्र पुस्तकांमध्ये शास्त्रज्ञ, विचारवंत, कलावंत, महापुरुषांची जीवनचरित्रे प्रतिभावंत लेखक समाजसुधारक तसेच खेळाडूंच्या प्रेरक पुस्तकांचा समावेश असतो भारताची थोर परंपरा लक्षात घेऊन सावरकर या पुस्तकांची निवड करतात पालकांसोबत कुटुंबातील सर्वांना हाताळता येतील अशी पुस्तके असल्याने दिवाळीचा आनंद कुटुंबातील सर्वांना साजरा करता येतो.



तरुण पिढीला वाचन संस्काराच्या माध्यमातून आपली कर्तव्ये व जबाबदारीची जाणीव व्हावी आणि त्यांच्यात समाजाविषयी आत्मीयता सहकार्य त्याग समर्पण आधी गुणांचे साहित्यातून उन्नयन व्हावे व ते वाढीस लागावी याकरिता ग्रंथ मित्र सचिन सावरकर यांनी राबविलेला हा उपक्रम म्हणजे भावी पिढी घडविण्याच्या दृष्टीने टाकलेले प्रथम पाऊल होय. मागील दहा वर्षापासून स्वतःला मिळालेल्या विविध पुरस्काराच्या रकमेतून पुस्तके खरेदी करून ही चळवळ ते राबवित आहेत. हा उपक्रम अधिक गतिमान करण्याकरिता विदर्भासह महाराष्ट्रातील प्रकाशकांनी कवींनी लेखकांनी विचारवंतांनी तसेच सामाजिक जाण असणाऱ्यांनी आपल्या जवळ असणारी पुस्तके 20 ऑक्टोंबर 2022 पर्यंत पुस्तक दोस्ती अभियाना साठी,मुलांना दिवाळीचा साहित्य फराळ म्हणून..... द्वारा सचिन सावरकर. प्रतापनगर. वर्धा .विदर्भया पत्त्यावर पाठवावी असे आव्हान पुस्तक दोस्ती कडून केले आहे.

# गोरगरिबांचा आधार, विश्वास आणि सातत्याने लढवय्ये नेतृत्व

आधुनिक केसरी

**15 ऑंक्टोबर म्हणजे मराठवाडा किसान कॉंग्रेसचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्ड सदस्य तथा जयभारती सेवाभावी संस्था व छत्रपती संभाजीराजे ग्लोबल स्कूलचे अध्यक्ष आदरणीय ॲड.माधव लिंबराज जाधव (आप्पा) यांचा जन्मदिवस. आप्पा एका सर्वसामान्य शेतकऱ्याच्या कुटूंबातून अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून घाटनांदूरसारख्या भागातून संघर्षमय जीवन, अत्यंत काबाडकष्ट, परिश्रम, मेहनत, जिद्द, उत्तम वक्तृत्व, संघटन कौशल्य, चिकाटी यातून घडलेले बहूआयामी व्यक्तीमत्व.**



आप्पांनी आपले शालेय शिक्षण घाटनांदूर येथे तर 11-12 वी परळी येथे पूर्ण करून बी.एड. केले व पुढे 3-4 विद्यार्थ्यांना शिकवणीच्या माध्यमातून शिकवण्यास सुरूवात केली. प्रचंड मेहनत, विद्यार्थ्यांचा रिझल्ट व पालकांचा विश्वास या त्रीसुत्रीने आप्पांनी आपल्या कोचिंग क्लासेसवरील पकड मजबूत केली व त्याचे एका मोठ्या शैक्षणिक संकूलात रूपांतर झाले. आजही कितीतरी गोरगरीब, ज्यांची आर्थिक परिस्थिती नाजूक असलेल्या, गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते. त्याचबरोबर शिक्षणासाठी मदतही दिली जाते. यादरम्यानच आप्पांनी वकीलीचे शिक्षण पूर्ण केले व वकीली व्यवसाय सुरू केला. त्यामध्ये प्रचंड मेहनत घेऊन आपला व्यवसाय नावारूपास आणला तसेच यामध्ये अनेक गोरगरीब लोकांची आप्पांनी मदत केलेली आहे. त्याबरोबरच जयभारती सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना शालेय मदत, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत करून त्यांचे अश्रू पुसण्याचे काम केले आहे व ते आजतागायत सुरू आहे.

तसेच विविध अठरापगड जातीधर्मातील गरजूंना मदत करतात. त्याबरोबरच अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केलेले आहे व करत आहेत. तसेच विविध आजारांनी त्रस्त असणाऱ्या व्यक्तींना आपला इलाज करता यावा यासाठी सर्वतोपरी आर्थिक मदत केलेली आहे आणि करतात. तसेच मागील वर्षी कोरोनासारख्या महाभयंकर महामारीमुळे सगळीकडे लाकडाऊन असताना SRT हास्पिटलमध्ये ॲडमिट असणाऱ्या व त्या पेशंटसोबत असणाऱ्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये यासाठी 30 ते 40 दिवस जवळपास अकरा हजार डबे पुरवण्याचे महान कार्य आप्पांनी केले. असे अनेक सामाजिक उपक्रम आप्पांनी राबवलेले आहेत. याबरोबरच छत्रपती संभाजीराजे ग्लोबल स्कूल व ज्युनिअर कालेज सारखे शैक्षणिक संकूल उभे करून नावारूपास आणले.

याबरोबरच वेगवेगळ्या विषयात होणारे सामाजिक आंदोलन असतील अगदी मराठा आरक्षणासारख्या संवेदनाशील विषयावरही कित्येकदा आंदोलने केली आहेत. यामधून अनेक केसेसला सामोरे गेलेले आहेत. त्याबरोबरच अनेक विद्यार्थ्यांच्या केस मोफत लढून त्यांना न्याय मिळवून देण्याचे अनमोल असे योगदान दिलेले आहे.

आप्पांनी नुकतीच आपल्या राजकीय करिअरला पुन्हा एकदा नव्याने सुरूवात करून काँग्रेस मध्ये प्रवेश करून आपले कार्य सुरू केले आहे. किसान काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र काँग्रेस चे प्रदेशाध्यक्ष सन्माननिय नानाभाऊ पटोले साहेबांनीही आप्पांच्या कार्याची दखल घेऊन मराठवाडा किसान काँग्रेसचे अध्यक्षपद दिले आहे. या पदाला न्याय देण्याचे काम आप्पा शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर आवाज उठवून करत आहेत. नुकताच शेतकऱ्यांना उदभवलेला गोगलगायीचा प्रश्न असेल किंवा पीकविम्याचा प्रश्न असेल तसेच जनावरांना सुरू झालेला लम्पी सारखा आजार अशा विविध प्रश्नावर सातत्याने आवाज उठवलेला आहे. तसेच अंबाजोगाई-लातूर महामार्गावरील उड्डाण पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे तसेच ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी रस्त्यामध्ये गेल्या आहेत त्यांना त्याचा मावेजा मिळावा म्हणून अनेकवेळा आंदोलन केले आहे. यातच पक्षाने आप्पांना नवीन जबाबदारी सोपवली आहे ती म्हणजे पार्लमेंटरी बोर्ड चे सदस्यत्व बहाल केलेले आहे. याचा फायदा निश्चितच पक्षाला करून देतील.

नुकत्याच झालेल्या मराठवाड्यातील अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची नुकसानीची पाहणी करून नुकसान भरपाईसाठी सन्माणनीय नानाभाऊंच्या माध्यमातून मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे. असे वेगवेगळ्या माध्यमातून एक नवीन उमदे जनसामान्याचे नेतृत्व एक आशेचा किरण म्हणून उदयास येत आहे. अशा या जनसामान्याचा,गोरगरीबांचा आधार,विश्वास असलेल्या व्यक्तीमत्वाचा आज वाढदिवस.......!

या वाढदिवसाप्रसंगी शैक्षणिक सामाजिक व राजकीय अशा प्रेरणादायी व्यक्तीमत्वास उदंड आयुष्याच्या हार्दीक शुभेच्छा.

आप्पा आप जिओ हजारो साल साल हो पचास हजार......!!

शब्दांकन
प्रा. श्रीकांत अंकुश खुणे

# सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावतेय

आधुनिक केसरी

आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे.

आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे.

वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे.

मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा - कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन.

एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो त्यांच्यात नैतिकतेची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.

# अन् गुलाबाचे झाड काटेदार झाले...!

आधुनिक केसरी

अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374



शाळेची निसर्ग सहल शाळेपासून जवळ असलेल्या फुलझाडांच्या उदयानात गेली. शाळेतील मुले-मुली उदयानात चोहीकडे फिरू लागली. उदयानात अनेक प्रकारची फुलांची झाडे होती. फुलांचा सुवास उदयानात चोहीकडे दरवळत असल्याने उदयानातीत वातावरण अगदी मनाला प्रसन्न करणारे होते. विनय आणि अब्दूल हे दोघेजण शिक्षकांची नजर चुकुवून गुलाबांची टवटवीत उमलेली लाल-पांढरी, पिवळी फुले घाईघाईत तोडता-तोडता त्या दोघांच्या हातांच्या बोटातून गुलाबाच्या झाडाला असलेले टोकदार कोटे टोचली गेल्याने बोटातून रक्त निघत होते. ते जोशीसरांनी पाहिले आणि लागलीच त्यांनी जवळ असलेल्या दस्ती फाडून दोघांच्या बोटाला बांधली. आणि रक्त येण्याचे थांबले व वेदनाही कमी होऊ लागले. हे सर्व दृश्य सवितासह संपूर्ण मुला-मुलींने पाहिले. सर्व विद्यार्थी उदयानात फिरून झाल्यावर जोशीसरांनी सांगितल्याप्रमाणे उदयानातील एका डेरेदार झाडाखाली बसले व आपापले डबे काढून जेवण केले. थकल्यामुळे सर्वांना चांगलीच भूक लागली होती. पोटभर जेवण झाल्यावर उदयानातील नळावर पाणी पिले. सरांच्या आदेशाप्रमाणे पुन्हा झाडाखाली सर्व विद्यार्थी येऊन बसले. जोशीसर सर्व प्रकारच्या फुलझाडांची माहिती सांगू लागले. "बागेत, कोणीही झाडांना अथवा फुले तोडू नये, असे फलक असतांनादेखील विनय व अब्दूल ने गुलाबांची फुले तोडली. त्यांची शिक्षा त्यांना मिळालीसुध्दा आहे." मध्येच सविता म्हणाली, "सर, इतर फुलांच्या झाडांना काटे नसतात, परंतु गुलाबाच्या झाडा-फांदयांना काटे का असतात ? "यावर जोशीसरांने गुलाबाच्या झाडांची मजेशीर गोष्ट सांगायला सुरुवात केली.

" मुलांनो फार-पूर्वी गुलाबाचे झाडदेखील जाईजुई, मोगरा-चमेलीच्या झाडाप्रमाणे होते. त्याला काटे नव्हते. असेच टारगट मुले फुलझांडाच्या जवळ जाऊन त्यांना आलेली टवटवीत गुलाबाची फुले ओरबडायची, कळ्या-पाकळ्या चुरगाळून बाजूला फेकून दयायची. हे त्या टारगट मुलांकडून फुलांच्या मोसमात नेहमीच घडायचे. फुलंझाडे त्यांच्या या दृष्ट कृतीने अगदी वैतागून गेले होते. झाडाना-फुलांना वेदना होत होते. पण त्यांना बोलता कुठे येत होते? टारगट मुलांच्या नेहमीच्या या दृष्ट वागण्याने फुले-झाडे कंटाळून गेली होती. त्याचा सर्वात जास्त त्रास गुलाबाच्या फुलांना व झाडांना व्हायचा. मग एके दिवशी गुलाबांच्या झाडांनी वनदेवीची भक्ती-प्रार्थना केली आणि आपली करूणा भाकली. वनदेवी गुलाबांच्या फुल- झाडांची भक्ती पाहून प्रसन्न झाली. वनदेवीपुढे गुलाबांच्या फुल-झाडांनी टारगट मुलांपासून झालेला त्रास व समस्या सांगितली. वनदेवी म्हणाली, " ठिक आहे. उदयापासून टारगट मुलेच काय, पण तुम्हाला व तुमच्या फुलांना कोणीच ओरबाडणार नाही."

सूर्य उगवण्या अगोदर आश्चर्य घडले गुलाबाच्या झाडा-फांदयांना टोकदार काटे आले. टारगट मुले फुले तोडण्यास- ओरबडण्यास पुन्हा आली. इतर फुले तोडता-तोडता त्यांनी गुलाबाचे टवटवीत सुंदर फुले ओरबाडताच त्यांच्या बोटे रक्त भंबाळ झाली. त्यांना खूप वेदना होऊ लागल्या. ते गुलाबाच्या फुल-झाडापासून घाबरून पळून गेले. वनदेवीच्या कृपेमुळे तेव्हापासून टोकदार काटेच गुलाबाच्या फुलांचे रक्षण करू लागले. ते आज पर्यंत आहे." सर्वांनी जोशीसरांकडून गुलाब फुल-झाडांची मजेशीर गोष्ट ऐकली व सर्व विद्यार्थी शाळेकडे निघाले.

# चतुर बिरबल

आधुनिक केसरी

एके दिवशी, एक श्रीमंत व्यापारी बिरबलकडे आला आणि म्हणाला, माझ्या घरी कोणीतरी चोरी केली व माझे दागिने चोरले आहेत. माझ्या घरी एकूण दहा नोकर आहेत. त्यांच्यापैकीच कोणीतरी ते चोरले असल्याचा माझा संशय आहे. मी त्यांच्यापैकी सगळ्यांना विचारले, पण त्यातील एकही कबूल झाला नाही. कृपा करून तुम्ही यातून काहीतरी मार्ग काढा.

बिरबल त्या श्रीमंत व्यापाऱ्याच्या घरी गेला. त्याने त्या दहाही नोकरांना एकत्र बोलावले व त्यांना म्हणाला, की माझ्याकडे दहा जादूच्या काठया आहेत. त्या मी तुम्हाला देत आहे. या काठयांचे



वैशिष्टय म्हणजे सर्व काठया समान आहेत. मी त्या तुम्हाला देत आहे. आज तुमच्याकडे ठेवा व उदया मला परत करा. ज्याने चोरी केली असेल, त्याची काठी रात्रीत एक इंचाने वाढेल.

दागिने चोरणारा नोकर घाबरला. आपली चोरी पकडली जाईल म्हणून तो काठी एक इंचाने कापतो. त्याला वाटते की सकाळी ती परत एक इंचाने वाढेल व कुणाला काही कळणार नाही. दुसऱ्या दिवशी बिरबलाने नोकरांच्या हातातील काठया पाहिल्या.

त्याला एका नोकराची काठी छोटी झाल्याचे आढळले. त्याच्याकडे बोट दाखवत बिरबल म्हणाला, 'हा नोकर चोर आहे. त्यानेच तुमचे दागिने चोरले आहे.'

शेवटी, त्या नोकरानेही ते कबूल केले व त्या व्यापाऱ्याचे दागिने परत केले.

तात्पर्य - करावे तसे भरावे.

2. बिरबल काळा कसा झाला

बिरबलचा रंग सावळा होता. एक दिवस दरबारात माणसाची सुंदरता आणि कुरूपता यावर चर्चा चालू होती. बरेच लोक माणसाच्या कुरूपतेचे स्मरण करूनच हसायला लागले. त्याच वेळी बिरबलचे दरबारात आगमन झाले. त्याला बघून सर्व दरबारी जोरजोरात हसायला लागले. बिरबलला वाटत होते की दरबारातील दरबाऱ्यांचे आकस्मात हसण्याचे कारण त्यांना विचारावे परंतु काही विचार करून तो गप्प राहीला.

त्यानंतर इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या व थोडयाचे वेळात बिरबलला संधी मिळाली तेव्हा त्याने अकबरला विचारले, 'महाराज! आपण सर्वजण हसतमुख का दिसत आहात?'

अकबर बोलला, 'लोकांच्या हसण्याचे कारण तुझी कुरूपता आहे, त्यांचे म्हणणे आहे की सर्व लोक गोरे आहेत परंतु बिरबल काळा कसा झाला.'

बिरबल बोलला, 'मला खेद वाटतो की, आत्तापर्यंत याचे कारण कोणालाही समजले नाही.' बादशहा बोलला सांगितल्याशिवाय लोकांना कसे समजणार. जर तुला कुरूपतेचे कारण माहीती असेल तर ते सर्वांना सांगून टाक व त्यांच्या मनातील भ्रम दूर कर.

बिरबलने उत्तर दिले, 'महाराज ज्या वेळेस परमेश्वराने सृष्टीचा निर्माणाला सुरूवात केली तेव्हा सर्वात आधी त्याने झाडांची व वेलींची निर्मिती केली. इतके करूनही तो संतुष्ट झाला नाही. त्यानंतर थोडा वेळ आनंद उपभोगला व उत्तम जीवांच्या निर्मितीचा विचार करून त्याने मनुष्याची रचना केली. तेव्हा त्याने अति आनंदित होऊन मनुष्यांना सर्व प्रथम रूप, दुसर धन, तिसरे बुध्दी, आणि चौथे बल प्रदान केले.

चारी गोष्टींना लांब लांब ठेवून सर्व मनुष्यांना आदेश दिला की या चारही गोष्टींमधून ज्याला जे पाहिजे असेल ते आपल्या इच्छेनुसार घेऊन जावे. या कामासाठी एक ठराविक वेळ ठरवून दिलेली होती. मी बुध्दी घेण्यात राहून गेलो जेव्हा दुसऱ्या गोष्टी घ्यायला गेलो तेव्हा वेळ निघून गेली होती त्यामुळे मी रिकाम्या हाती परतलो. मी फक्त बुध्दीच घेऊन राहून गेलो आणि तुम्ही मात्र धन आणि रूप यांच्या लालचमध्ये होते. याच कारणामुळे मी कुरूप राहून गेलो.

बिरबलचे हे उत्तर ऐकून बादशहा अकबर व दरबाऱ्यांची मने तुटली आणि नंतर त्या लोकांनी बिरबलची मजाक कधीच केली नाही.




शिवानी राजेंद्र सिमंत
सेंट लौरेंस स्कूल, औरंगाबाद











# वाचाल तर वाचाल



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

यावरून ग्रंथ आपले गुरु आहे हा संदेश आपण ग्रहण करायला पाहिजे. ज्ञान, विज्ञान, इतिहास, साहित्य, धर्म, संस्कृती अशा कितीतरी रत्नांची उधळण या ग्रंथांमध्ये केलेली असते. एखादे पुस्तक कशाला एखादे वाक्य, एखादी ओळ सुद्धा एखाद्याचे जीवन बदलून देऊ शकते. आणि म्हणून विद्यार्थ्यांनीच नव्हे तर महिलांनी, गृहिणींनी ज्येष्ठांनी, प्रत्येकानेच आपापल्या वयानुसार जे मार्गदर्शन हस्तगत करायचे तशा पद्धतीचे पुस्तक, ग्रंथ आपल्या वाचनात ठेवणे गरजेचे आहे. आपण वाचावे व इतरांना वाचते करावे. वाचाल तर वाचाल म्हणजे जर तुम्हाला टिकून राहायचे असेल तर तुम्हाला वाचन करणे आवश्यक आहे .यासाठी"एकमेका ग्रंथ देऊ, अवघे धरू सुपंथ" हा मंत्र सर्वांनी आचरणात आणणे आवश्यक आहे.

15 ऑक्टोबर हा माजी राष्ट्रपती स्वर्गीय डॉक्टर ए पी जे अब्दुल कलाम यांचा वाढदिवस आहे. हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. टीव्ही, मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्या जमान्यात पुस्तक हे बरेच मागे पडलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे वाचनच कमी झालेले आहे. आपला देश, धर्म, इतिहास, संस्कृती याबद्दलचे ज्ञान विद्यार्थ्यांना ज्या ग्रंथातून प्राप्त होऊ शकते ते ग्रंथ आज उपलब्ध आहेत परंतु वाचणारे उपलब्ध नाही. त्यामुळे वाचन प्रेरणा निर्माण करणे आवश्यक आहे

ज्यावेळेस मुद्रण कला जगामध्ये अस्तित्वात नव्हती त्याही वेळेस आमच्या देशामध्ये विविध प्रकारचे ग्रंथ हे भूर्जपत्रांवर लिहिले गेले. एका ग्रंथाची काही पाने ही बकरीने खाऊन टाकली तर त्या ग्रंथांमध्ये सुद्धा पुढील पाने बकरीने खाल्ली अशा पद्धतीचा उल्लेख केला होता. मुद्रण कला जेव्हा अस्तित्वात नव्हती त्यावेळेस आमच्या देशामध्ये एक पाठी, द्विपाठी, त्रिपाठी असे लोक होते. म्हणजे एकदा ऐकलेलं ज्यांना पाठ होत होतं दोनदा ऐकून ज्यांना पाठ व्हायचे व तीनदा ऐकून ज्यांना पाठ व्हायचे असे लोक होते. वेद आणि उपनिषदं सुद्धा लोकांनी कंठस्थ केलेली होती. त्यानंतर कंठस्थ केलेले सुद्धा कुठेतरी लिहिलेले असले पाहिजे म्हणून भूर्जपत्रांवर लिहिणे प्रारंभ झाले. अनेक शतके लोक भूर्जपत्र वाचायचे. विविध प्रकारचे ज्ञान आत्मसात करायचे. कागदाचा व प्रिंटिंग मशीन चा शोध लागल्यावर वेगवेगळ्या छापखान्यामध्ये पुस्तके छापली जाऊ लागली. वृत्तपत्र निघू लागली. दैनंदिन बातम्या विचारणीय लेख यातून समाज प्रबोधन होऊ लागले. लोकमान्य टिळकांनी आपल्या केसरी या वृत्तपत्रामध्ये "सरकारचे डोके ठिकाणावर आहे का " राज्य करणे म्हणजे सूड घेणे नव्हे" अशा पद्धतीचे लेख लिहिले ज्याबद्दल त्यांना भारतीय असंतोषाचे जनक म्हटले गेले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लंडनमध्ये असताना "1857 चे स्वातंत्र्यसमर" हे पुस्तक लिहून काढले. हे पुस्तक प्रकाशित होण्याआधीच इंग्रज सरकारने ते जप्त करण्याचा चंग बांधला. त्यामुळे शेवटी त्याला फ्रान्समध्ये छापावे लागले. त्याची पांडू लिपी हरवू नये म्हणून जगातल्या वेगवेगळ्या भाषांमध्ये त्याचे भाषांतर करण्यात आले व शेवटी ते पुस्तक कसेबसे भारतात पोहोचले. ज्या क्रांतिकारकांना इंग्रज सरकारने अटक केली त्यांच्या घराची झाडाझडती घेतल्यावर त्यामध्ये एक गोष्ट त्यांना हमखास सापडायची ती म्हणजे 1857 चे स्वातंत्र्यसमर, हे पुस्तक. यावरून आपल्या असे लक्षात येईल की समाजमन तयार करणे, देशभक्तीची भावना निर्माण करणे, राष्ट्राकरिता काहीतरी करण्याची जिद्द निर्माण करणे या गोष्टी पुस्तकांनी शक्य करून दाखविलेल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारची ऐतिहासिक आणि देशभक्तीचे शिक्षण देणारी पुस्तके ही आमची मित्र आहेत. तरुणांसाठी मार्गदर्शक आहेत.

आजची तरुण पिढी ही ध्येयविहीन आहे असे आपण म्हणतो. शाळा झाले की कॉलेज,कॉलेज झाले की नोकरी व नोकरी झाली की निवृत्ती असे एक चक्र झालेले आहे. परंतु याच जीवनामध्ये ध्येयवादाचे बीज पेरण्याचं काम पुस्तके करू शकतात. आमच्या देशांमध्ये महापुरुषांची कमतरता नाही. महापुरुषांनी आम्हाला ध्येय दिलेले आहे. त्यासाठी कार्य करायला सांगितलेले आहे. स्वामी



विवेकानंद सुद्धा म्हणायचे की मला ध्येयानी भरलेली शंभर तरुण मुले हवी आहेत. ती जर मला मिळाली तर मी संपूर्ण भारताचे चित्र बदलून टाकू शकतो. स्वामीजींचे विचार सुद्धा आज अनेक अनेक पुस्तकांमध्ये संग्रहित करण्यात आलेले आहे. एक तरुण आत्महत्या करायला निघाला होता. रेल्वे स्थानकावर फिरताना त्याची नजर पुस्तकांच्या दुकानांमध्ये ठेवलेल्या स्वामी विवेकानंदांच्या पुस्तकावर गेली. त्याने ते पुस्तक घेतले व वाचून काढले. त्या पुस्तकाचा त्याच्या मनावर इतका परिणाम झाला की त्याने आत्महत्येचा विचार सोडून दिला व लोक कल्याणासाठी आपले जीवन समर्पित करण्याचा निर्णय घेतला. हा तरुण म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून राळेगणसिद्धी हे गाव लोकसहभागातून समृद्ध आणि प्रगतिशील बनविणारे अण्णा हजारे होय. स्वामीजी म्हणतात माझ्या विचारांना तुम्ही मातीमध्ये खोल गाडून जरी टाकले तरीसुद्धा योग्य वातावरण मिळाल्यावर ते विचार खडकांना फोडून सुद्धा बाहेर येतील. इतके प्रेरणादायी विचार मिळण्याचे एकमात्र स्थान म्हणजे पुस्तक होय. छत्रपती शिवाजी महाराज हे आमच्या सर्वांचे आदर्श आहे. विविध प्रकारच्या बादशाह्यांनी त्यांचे इवलेसे स्वराज्य ज्यावेळेला घेरले गेलेले होते, त्यावेळेला मोठ्या हिमतीने त्यांनी आपल्या सवंगड्यांना एकत्र करून हिंदवी स्वराज्याचे बीजारोपण केले व अत्यंत धाडसाने, कल्पकतेने, चातुर्याने बादशाह्यांना परास्त केले व हिंदवी स्वराज्य उभारले. अशा छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन हे प्रत्येक पिढीतील प्रत्येक तरुणांनी, बालकांनी वाचलेच पाहिजे असे आहे. त्यासाठी आपल्या घरी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र असायला हवे की जे वेगवेगळ्या संकटाच्या प्रसंगी हताश आणि निराश होणाऱ्या तरुणांना मार्गदर्शन करेल. समर्थ रामदास स्वामी यांनी सुद्धा लोकांना अतिशय बहुमोल मार्गदर्शन केले. परंतु आपले अवतार कार्य संपवतांना ते म्हणाले की मी आजपर्यंत केलेले सर्व मार्गदर्शन एका ग्रंथात भरून ठेवलेले आहे व तो ग्रंथ म्हणजे दासबोध. दासबोध जर तुम्ही वाचला तर तुम्हाला मी गेलो असे वाटणार नाही. विविध साधू संतांचे जीवन ग्रंथातून वाचताना आपल्याला ते आजही विद्यमान आहेत असेच वाटते. व त्यामुळे त्यांनी सांगितलेल्या शिकवणीनुसार जीवन चालविण्याची प्रेरणा मिळते. शिखांचे दहावे गुरु,गुरू गोविंद सिंह हे गेल्यानंतर त्यांनी गुरु ग्रंथ साहेब यालाच गुरु मानायला सांगितले होते. करोडो लोकांचा शीख समाज आजही एका ग्रंथाला आपला गुरु मानत आहे ही कितीतरी मोठी गोष्ट आहे. यावरून ग्रंथ आपले गुरु आहे हा संदेश आपण ग्रहण करायला पाहिजे. ज्ञान, विज्ञान, इतिहास, साहित्य, धर्म, संस्कृती अशा कितीतरी रत्नांची उधळण या ग्रंथांमध्ये केलेली असते. एखादे पुस्तक कशाला एखादे वाक्य, एखादी ओळ सुद्धा एखाद्याचे जीवन बदलून देऊ शकते. आणि म्हणून विद्यार्थ्यांनीच नव्हे तर महिलांनी, गृहिणींनी ज्येष्ठांनी, प्रत्येकानेच आपापल्या वयानुसार जे मार्गदर्शन हस्तगत करायचे तशा पद्धतीचे पुस्तक, ग्रंथ आपल्या वाचनात ठेवणे गरजेचे आहे. आपण वाचावे व इतरांना वाचते करावे. वाचाल तर वाचाल म्हणजे जर तुम्हाला टिकून राहायचे असेल तर तुम्हाला वाचन करणे आवश्यक आहे .यासाठी"एकमेका ग्रंथ देऊ, अवघे धरू सुपंथ" हा मंत्र सर्वांनी आचरणात आणणे आवश्यक आहे.

# मॅटवानाचा ड्रायव्हर (वऱ्हाडी लघुकथा)



सु. पुं. अढाऊकर
अकोला

आधुनिक केसरी

यावरून ग्रंथ आपले गुरु आहे हा संदेश आपण ग्रहण करायला पाहिजे. ज्ञान, विज्ञान, इतिहास, साहित्य, धर्म, संस्कृती अशा कितीतरी रत्नांची उधळण या ग्रंथांमध्ये केलेली असते. एखादे पुस्तक कशाला एखादे वाक्य, एखादी ओळ सुद्धा एखाद्याचे जीवन बदलून देऊ शकते. आणि म्हणून विद्यार्थ्यांनीच नव्हे तर महिलांनी, गृहिणींनी ज्येष्ठांनी, प्रत्येकानेच आपापल्या वयानुसार जे मार्गदर्शन हस्तगत करायचे तशा पद्धतीचे पुस्तक, ग्रंथ आपल्या वाचनात ठेवणे गरजेचे आहे. आपण वाचावे व इतरांना वाचते करावे. वाचाल तर वाचाल म्हणजे जर तुम्हाला टिकून राहायचे असेल तर तुम्हाला वाचन करणे आवश्यक आहे .यासाठी"एकमेका ग्रंथ देऊ, अवघे धरू सुपंथ" हा मंत्र सर्वांनी आचरणात आणणे आवश्यक आहे.

माह्या भाकरं ह्या काव्यसंग्रहाले पुणे जिल्ह्यातला कवयित्री शांताबाई शेळके जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला होता. थो २१.१०.२०१८ ले पुन्यात भेटनारं होता. पुरस्कार घ्याले जाचं होतं पन् कस् जावं , काह्यी केल्या समजतं नोत. मंग म्या ठरोल लेकाच पुन जौळचं त हायं कायले एस.टी. अन् अगनगाळीनं जावाव . म्हनून एका ट्रॅव्हल्स सेंटर वदर गेलो. तथुल्ल्या मॅनेजर ले म्हतल.

" मुझे एक गाडी चाहिये थी एक दिन के लिए पुना जाने के लिए.."

त्यान लगेच एक बुक काहाळल . थ्यात दोनकं मिन्ट तोंड खुपसलं. मंग त्यातले रेट सांगितले. एसी, नॉन एसी गाड्यायची साईज . म्या त्याले म्हतल.

" छोटी नॅनो नही चलेंगी क्या ."

त थो म्हनला.

" साहाब वह एक लाख वाली कार है ! पुना जाने को दो दिन लगायेगी ."

मंग त्यान मले सल्ला देल्ला .

" एक काम करो तुम सॅन्टो कार लेकर जावो यह कार अच्छी रहेंगी..."

मंग किलोमीटरमांग तीनं रूपये द्याचं ठरल. थ्या मॅनेजर ले ऊलीसा ॲडव्हान्स , मोबाईल नंबर अन पत्ता देला. दुसऱ्या दिवशी पायटीच पाच वाजता गाळी घेवूनसन्या पाठवाले सांगितल ...मी चप्पल घालाले हाफीसच्या बाहेरी जसा निंघालो तस्स मॅनेजर न मले हटकलं. अंदरे डबल बलावल ...अन भेत भेत एक गोष्ट सांगतली.

" साहाब मै जो ड्रायव्हर भेज रहा हूँ वह अनपढ और जरासा सरकीट है..."

मले जरा भेव वाटलं की अशिक्षित असन त चालन पन सरकीट आता कस होईन. मले थ्या अनामिका ड्रायव्हरचं भेव लागत होतं. माह्या सोबत सायन चे मैतर कृष्णा सज्जन हे ही येनार होते. थे साहित्याचे चांगले रसिक हायेत. दुसऱ्या दिवशी पायटीच ऊठलो. तयारी केली. ड्रायव्हर चा फोन आला . म्या म्हतल " कोन ? तीकून अवाज आला ...

" मै मोहम्मद हबीब खानं. "

म्या पटपट तयारी आटोपून कृष्णा सज्जन ययले फोन केला थे कुर्ला पर्यंत लोकल न पोचले होते. आम्हाले नेरुळ ठेसनावर भेटाच होतं . मी लवकर तयारी करून नेरुळ ठेसनावर पोहचलो. ड्रायव्हर मोहम्मद ययले भेटलो. ऊच्चीपुरा माणूस , रंगान निमगोरा , अंगकाठीन धळधाकट , बसक नाक , नेपाळीवानी दिसत होता . हात मिळवला त्याले नाव सांगितल . मस्त बोलका मानूस वाटला . पन मॅनेजर न जे सांगितल होत थे सारं खोटं वाटत होत . थोड्यावेळान कृष्णा भाऊ आले . जवळच असलेल्या चायच्या टपरीवर तीनं कटिंग घेतल्या . पटरीच्या मोरचं मेंदूवळे गरम गरम निंघत होते . मोहम्मद च्या नाकात वास घुसला होता . त्याले जीभीचा मोहं काह्यी केल्या आवरता आला नाही . अन त्यानं म्हतल...

" साहाब जरा नाष्टा कर लू क्या .."

मंग म्या म्हतल ..

" जरूर मोहम्मद भाई...आप करो नाष्टा .."

मोहम्मद न नाष्टा केला पानी घेवूनसन्या लघवी ले गेला . एक फोर क्वेअर सिगरेट फुकली . अन आम्ही दोघ गाळीच्या मांगच्या शीटवर बसलो . अन मोहम्मद न गाळी चालवाले सुरवात केली . चालू करता करता दोन वेळा गाळी बंद पळली . माह्या मनाले थ्या मॅनेजर चा इचार चाटून गेला . हा मोहम्मद खरच त सरकीट नसन लेक .. गाळी चालू झाली पटपट पयला दुसरा तीसरा अन चवथा ही गेअर मोहम्मदन टाकला....गाळी भं भं भं ...पीक पीक पीक करत थो पीटायत होता ... मोहम्मद रफी , लता मंगेशकर , अशोक कुमार , मन्नाडे ययचे गाने वाजवत होता..गाळीचे काच खाली घेतले होते. थन्डगार हवा आंगाले लागत होती .केस भुरभुर ऊळत होते...मोहम्मद न प्रश्न केला.

" साहाब अब किधर लू .."

माह्या आनंदावर त्यान इरजन घातल होतं ... माह्या डोया मोरं मॅनेजर पुसटसा येवून गेला . मनातल्या मनात ईचार केला. 'हन्त तुया मायची खटपट फालतू गाळी केली ..'

मोहम्मद ले म्या म्हतल ..

" क्यू आपको मालूम नही क्या पुना किधर है ."

त थो म्हनाला ..

" साहाब कई अरसे से पूना नही गया इसलिये जरा रास्ता भूल गया.."

कृष्णा भाऊ तसे तापट स्वभावाचे. पन मनान मातर फनसाच्या गोळ गर्या सारखे. अन् नारया सारखे ...कृष्णा भाऊ ययले मोहम्मद च्या थ्या ऊत्तराचा राग आला होता .. अन शेवटी तेयची जीभ सैल झालीचं...

" ऐ भई तुझे रस्ता मालूम नही तु क्या खाक ड्रायव्हर है क्या फिर.."

मी जरा कृष्णा भौ ययले समजावल.

"जावू द्या भौ मी सांगतो रस्ता मोहम्मद भाई ले... एक काम करो मोहम्मद भाई पामबीच से गाडी लो बेलापूर पार करकर पनवेल रोड पे गाडी को लो..."

म्या काय म्हतल थे मोहम्मद ले समजल होतं. मोहम्मद गाळी इमानासारखा पीटायत होता.. एकशे सत्तर एकशे अंसी च्या स्पीड न गाळी चालवत होता. गाळी हवेसंग बोलत होती . दृश्य आजूबाजूलचे काह्यी केल्या दिसत नोहते . हवा थंडगार लागत होती . माह्यी झोप न झाल्यानं मुंडक खिळकीत टेकवून मी झोपी गेलो होतो . कृष्णा भाऊ ले ही डुलकी येत होती . अर्ध्या तासान मी ऊठलो पायतो त काय. आम्ही दुसऱ्याच मार्गान खोपोली ले पोचलो होतो . मोहम्मद खाली उतरून एका पानबीडीच्या दुकानावर सिगरेट फुकत ऊभा होता. मी कृष्णा भौ ययले ऊठवलं .आंगमोई देत थे ऊटले. आम्ही दोघेही गाळीच्या बाहेर निंघालो. आम्ही दोघही मोहम्मद वर भळकलो . त्यांन आम्हाले पुना मुंबई एक्स्प्रेस हायवे न नेवून खोपोली ले आनून टाकलं होतं . आम्ही त्याले जवा बोलाले लागलो तवा थो आम्हालेच ऊलटून बोलाले लागला.

" आप क्यू सोये फीर ...तुम्हे मालूम था ना मुझे पुना किधर है मालूम नही . फिर भी आप आराम से सो गये."

माह्या डोयाम्होर थो मॅनेजर डबल तरळून गेला . मंग म्या अन कृष्णा भाऊन ठरवल आता झोपाच नाह्यी. डबल गाळी मांग घेवून पूना मुंबई एक्स्प्रेस हायवे वर लावली . पुळे हिरव्या रंगाची पाटी आली की मोहम्मद पलटून पाह्ये अन मले म्हणे ..

" साहाब पढो क्या लिखा है."

मंग मी मान खाली वाकवून डोये वदरे करून पाटी वाचो अन दाखोलेल्या बानापरमान मोहम्मद ले गाळी वळवाले लावो . पन काहीही केल्या मोहम्मद ची स्पीड कमी होये ना ...कृष्णा भाऊ थ्याले घळीघळी टोकत होते .

" अरे भाई मारेगे क्या ....धीरे चलावो मोहम्मद भाई. "

पन काह्यी केल्या स्पीड कमी होयना . तेयले स्पीड कमी करा अस म्हतल की , अखीनचं जोर चळे ....म्या त मोहम्मद ले म्हनाच सोळूनच देल्ल होतं ...पन कृष्णा भाऊ त्याले वारंवार ईस्पीड कमी करासाठी म्हनत होते . माह्यी नजर अन मन फकस्त रोळवरल्या पाट्यावर गुतून होतं . मी मोहम्मद ले कवा राईट घ्या, लेफ्ट घ्या, नागमोयी वळनं, इस्पीड बेर्कर , पुळे शाया, पुळे गावं असच सांगत होतो . पन मोहम्मद ची स्पीड पाहून कृष्णा भाऊ चे मन काह्यी केल्या राहेना...थे मोहम्मद ले घळीघळी टोकत होते ...खालापूरचा टोल लागला होता. टोल भरून आम्ही पुळे निंघालो एक पाटी लेहली होती ' फूड प्लाझा ' पाटी पाहून मले भूक लागली होती . मोहम्मद ले डाव्या बाजूले गाळी लावाची सांगितली . आम्ही दोघ खाली ऊतरलो . मोहम्मद ले गाळीचे काचं लावून लॉक कराच सांगीतल. आम्ही जरा तोंडावर पानी मारून फ्रेश झालो. एक एक वडापाव घेतला . तीन कटिंग घेतल्या. अन पान्याची थन्ड बाटली घेवून . गाळीत बसून निंघालो. पुळे लोणावळा लागला थंड हवेचं ठिकाण ...मस्त पहाळपट्टी यरीया त्याच्यात हिरवेगार झाळ, डोंगर, हटेली लयच साजर ठिकानं वाटत होतं . नवीन जोळपे अतीसाच येतात . मले वाटलं सायाच आपन कामून नाह्यी आलो अतीसा ...

मोहम्मद न डबल आवाज देल्ला...

" साहाब पाटी आया है ." लोणावळ्यावून मन मारूनं नजर हटवून म्या मान खाली घेवून नजर वर करून पाटी पाह्यत होतो . मोहम्मद ले म्हतल..

" सीधा जाने दो मोहम्मद भाई."

' पुळे घाट आहे वाहने हळू चालवा.'

अशी पाटी होती . कृष्णा भाऊ घायबराले लागले ...कृष्णा भाऊ मोहम्मद ले समजावून सांगत होते..

" देखो मोहम्मद भाई यह घाट है . यहा पर गाडी धीरे चलानी की , नही तो गाडी का ॲक्सीडेंट होकर अपून गाडी के साथ मे खाई मे गीर जायेंगे."

पन मोहम्मद न कृष्णा भाऊ चे वाक्य एका कानान आयकले अन दुसर्या कानान सोडून देल्ले....

मोहम्मद ची स्पीड काही केल्या कमी होत नोती. मोहम्मद घाटातही ओव्हरटेक करत होता। आता मातर आम्ही दोघही घाबरलो होतो . कृष्णा भाऊ चा जिभीचा तोल सुटला अन पट्टा चालू झाला . .


" अरे ओय! भाई धीरे चलाता की नही.. मारेगा क्या ...खाई मे गीरायेंगा क्या.."

आता मातर कृष्णा भाऊ एकेरीवर आले होते. पन मोहम्मद काही केल्या आयकत नोता . त्याची ईस्पीड कायम होती . कृष्णा भाऊ त्याले टोकत होते ..आता मलेही भेव लागत होता. घाटात दोन खेपा त्यान ओव्हरटेक केल होतं. म्या डोये लावून घेतले होते. पन कृष्णा भौ च त्याले वारंवार टोकन चालूच होत . " आता मातर मोहम्मद न हदच पार केली होती . कृष्णा भौ त्याले आरेकारे बोलू लागले .....

" अबे ओय पागल तुझे कुछ समज मे आ रहा क्या. मै क्या बोल रहा हूँ तो...धीरे चला- धीरे चला कितने बार बोलू तुझे . समझ मे नही आ रहा क्या मै क्या चिल्ला रहा हूँ तो...एक काम कर गाडी बाजू में रूका मै पैदल आता...."

मोहम्मद गालात हासत होता.

(क्रमशः)



# नुकसान भरपाई तरी द्या किंवा हक्काचा विमा तरी द्या

## पावसाने कंबरडे मोडलेल्या शेतकऱ्यांची मागणी : आठ दिवसावर दिवाळी आली तरी दमडीची मदत नाही

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये गेल्या चार दिवसांपासून परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. यामुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचा हाता-तोंडाशी आलेला घास परतीच्या पावसाने हिरावून घेतल्याने शेतकरी वर्ग चिंतातुर झाला आहे. आठ दिवसावर आलेली दिवाळी आणि पैशाअभावी खोंळबलेली रब्बी पेरणी यामुळे शेतकऱ्यांसमोर इकडे आड, तिकडे विहीर हिच दशा झाली आहे.यावर्षी खरिपातील सोयाबीन हंगाम टिकवणे शेतकऱ्यांसाठी एक आव्हानच होते. सोयाबीन उगवण्याच्या सुरुवातीलाच गोगलगाय ने अनेक उद्ध्वस्त केलेले फड, त्यानंतर सोयाबीन वाढीच्या अवस्थेत पावसाचा खंड त्यावर कसेबसे मात करत सोयाबीन फुलोरा अवस्थेत असताना यलो मोज्याक आजाराचा उद्रेक या अडचणी मधून मजल दरमजल प्रवास करत शेतकऱ्यांनी पिकवलेले सोयाबीन डोळ्यात देखत परतीच्या पावसाने गुडघाभर पाण्यात बुडत आहे.

आता मात्र या परतीच्या पावसाच्या थैमान मुळे बळीराजा कडे पूर्णतः निराशा झालेली दिसून येत आहे. हा पाऊस अनेक भागात तडाखा देत आहे. यामुळे शेतकरी हतबल झालेला असतानाच चिखलामुळे व पाण्यातील सोयाबीन काढण्यासाठी मजूर वर्ग जास्तीचे पैसे मागत असल्याने शेतकऱ्यांसमोर तेही संकट उभा राहिले आहे. तर काही उभ्या सोयाबीन पिकाला कोंब फुटायला सुरुवात झालेली आहे. या झालेल्या नुकसानीमुळे जिल्ह्यातून तब्बल 4 लाख 85 हजार 771 एवढ्या तक्रारी विमा कंपनीकडे शेतकऱ्यांनी केलेल्या आहेत. त्यापैकी 3 लाख 50 हजार 056 तक्रारीचा सर्वे विमा प्रतिनिधींकडून करण्यात आला आहे. सदर सर्वे मधून 82 हजार 043 तक्रारी त्रुटी मध्ये आढळून आलेल्या आहेत. शेतकरी वर्गामधून मात्र विमा कंपनीकडून इतर जिल्ह्याप्रमाणेच याही जिल्ह्यात लवकरात लवकर विमा मंजूर करून 25 टक्के अग्रमी रक्कम तात्काळ बँक खात्यावर वर्ग करावी जेणेकरून दिवाळी नाही झाली तरी चालेल पण रब्बीची पेरणी तरी होईल हेच शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे. जेमतेम भाग भांडवल लावून खरिपाची पेरणी केलेली त्यातून आता पेरणीचा खर्च तरी निघेल का अशाच पेचात अडकलेल्या शेतकऱ्यांसमोर परतीच्या पावसाने अजून एक नवीन समस्यांचा डोंगर उभा केला आहे. सत्तेत विराजमान नवीन सरकार तरी आमची दिवाळी गोड करणार का? तुमच्या पाठीमागे आमच्या पोरांना काठ्यावर चालवे लागेल असे भर सभेत सांगता एकदा आमच्या हातातील विळा घेऊन आमच्या शेतात उतरा अश्याच प्रकारचे आवाहन शेतकऱ्यांकडून विविध गटांच्या राजकारण्यांना केले जात आहे. रब्बी साठी पोषक असणाऱ्या परतीच्या पावसाने खरीप पिकाला पाण्यात बुडूनच मारल्याने अतोनात नुकसान झालेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लवकरात लवकर शासनाने जाहीर केलेली मदत देण्यात यावी व विमा कंपनीला सुद्धा त्यांच्या हक्काचा संबंधित पिकाचा विमा मंजूर करून तात्काळ आग्रमी रक्कम देण्याच्या सूचना कराव्यात हीच मागणी मोठ्या प्रमाणावर शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

# राष्ट्रवादी पक्षाचे प्रवक्ते महेश तपासे यांची टिका म्हणजे चोरांच्या उलट्या बोंबा होय

## भाजपा राज्य प्रवक्ता राम कुलकर्णी यांचे सडेतोड उत्तर

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** महाविकास अघाडी 2019 मध्ये सत्तेवर येत्याच तत्कालीन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीम यांनी बीड जिल्ह्यात केज गेवराई विधानसभा मतदार संघात विकास कामांना स्थगिती देवून 100 कोटीचा निधी कागल आणि बारामती मतदार संघात वळवल्याची आठवण भाजपा राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यानी राष्ट्रवादी प्रवक्ते महेश तपासे यांना करून दिली. एक बोट दुसऱ्या कडे दाखवतो तेंव्हा चार बोट आपल्या कडे असतात असा टोमणा त्यांनी लगावला त्यांची टीका म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा असेही त्यांनी म्हटले आहे. शिंदे फडणविस सरकारने महाविकास आघाडीच्या विशेष करून ग्रामविकास खात्याने मंजुर केलेल्या विकास कामाना स्थगिती दिल्या नंतर राष्ट्रवादी पक्षाच्या पोटात गोळा उठणे साहजिकच म्हणावे लागेल. त्या पक्षाचे प्रवक्ते महेश तपासे यांनी यावर टिका करताना स्थगिती सरकार आशी टिका केली. मात्र तपासे यांच्या टिकेचा खरपूस समाचार घेतांना राम कुलकर्णी जोरदार हल्ला चढवत तपासेनी अगोदर आत्मपरिक्षण करण्याचा सल्ला त्यांनी दिला. तुम्ही आम्हाला स्थगिती सरकार म्हणता तर मग तुम्ही 2019 मध्ये सतेवर येताच बीड जिल्ह्यात तत्कालीन ग्रामविकास मंत्री पंकजाताई मुंडेनी मंजुर केलेल्या 100 कोटीचा कामांना हसन मुश्रीम यांनी स्थगिती दिली. एढेच नाही तर केज आणि गेवराई विधानसभा मतदार संघ जे भाजपा कडे आहेत त्या दोन मतदार संघात राजकिय आकसापोटी मंजुर निधी पळवल्याची आठवण कुलकर्णी यांनी तपासे यांना करून दिली. या प्रकरणात आमचे कार्यकर्ते उच्च न्यायालयात गेले तिथे न्याय मिळाला होता. तपासे यांची टिका म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा असून अगोदर स्वःताचे आत्मपरिक्षण करा असा सल्ला कुलकर्णी यांनी दिला. शिंदे फडणविस हे सरकार स्थगिती सरकार नसून विकास कामांना गति देणार सरकार हे विरोधकानी लक्षात घ्यावे, असे राम कुलकर्णी यांनी म्हटले.

# माजी आ. अवधूत तटकरे आणि मीरा भाईंदरचे तीन नगरसेवक भाजपामध्ये

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी उद्धव ठाकरे शिवसेनेचे युवा नेते व श्रीवर्धनचे माजी आमदार अवधूत तटकरे तसेच मीरा भाईंदरच्या तीन नगरसेवकांनी मुंबईत भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे उद्धव ठाकरे शिवसेनेला धक्का बसला. मीरा भाईंदरमधील एका काँग्रेस नगरसेवकानेही भाजपामध्ये प्रवेश केला. यावेळी अन्न व नागरी पुरवठामंत्री रविंद्र चव्हाण, आ. प्रशांत ठाकूर आणि माजी आमदार नरेंद्र मेहता उपस्थित होते. मीरा भाईंदर महानगरपालिकेतील उद्धव ठाकरे शिवसेनेचे नगरसेवक दिप्ती भट्ट, अनिता पाटील व कुसुम गुप्ता तसेच काँग्रेसचे नगरसेवक नरेश पाटील यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. अवधूत तटकरेंचा भाजपा प्रवेश म्हणजे रायगड जिल्ह्यामध्ये उद्धव ठाकरे यांना मोठा झटका आहे व निश्चितपणे कोकणात त्यांना रोज असे झटके बसणार आहेत, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. बावनकुळे म्हणाले की, युतीमध्ये भाजपाने रायगडसह कोकणात शिवसेनेला महत्त्व दिल्यामुळे भाजपाचे संघटन मजबूत झाले नव्हते. आता भाजपा स्वतंत्रपणे संघटना मजबुतीने उभी करत आहे.

# धुळे जि. प. अध्यक्षपदी अश्विनी पाटील

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** भाजपाने पुन्हा धक्कातंत्राचा अवलंब अध्यक्षपदासाठी भूषण करत ऐनवेळेस अश्विनीताई पाटील यांना संधी दिली. अश्विनीताई ह्या प्रथमच जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्या आहेत. पक्षाने त्यांना धुळे तालुक्यातून अध्यक्षपदाचा बहुमान दिल्याने इच्छुक मातब्बरांना माघार घ्यावी लागली. तर उपसभापतीपदी शिरपूर तालुक्यातील शिंगावे गटाचे देवेंद्र जयराम पाटील यांना दुबार संधी मिळाली आहे. जि. प.चे अध्यक्ष व उपाध्यक्षपदाचा अडीच वर्षांचा कार्यकाळ संपल्याने आज नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीची प्रक्रिया पार पडली. पीठासीन अधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडत आहे. अनेकजण इच्छुक असल्याने कोणाला संधी मिळणार याकडे साऱ्यांचे लक्ष लागून होते त्यात लामकानी गटाच्या धरतीताई देवरे यांच्या नावाची जोरात चर्चा होती . शिवाय साक्री तालुक्यातून मंगलाताई पाटील , शिंदखेडा तालुक्यातून कुसूमताई निकम तर शिरपूर तालुक्यातून अभिलाषाताई पाटील यांचीही नावे चर्चेत होती. अध्यक्ष व उपाध्यक्षपदी कोणाची वर्णी लागेल याबाबत कमालिची गोपनियता पाळण्यात आली . त्यामुळे शेवटपर्यंत उत्सुकता कायम होती. आज नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या वेळेस भाजपाकडून अध्यक्षपदाचा उमेदवार जाहीर करण्यात आला. यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रा. अरविंद जाधव, जि.प. सभापती संग्राम पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तर उपसभापती पदासाठी शिरपूर तालुक्यातील शिंगावे गटाचे देवेंद्र जयराम पाटील यांना संधी देण्यात येवून त्यांचे नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले. अध्यक्षपदासाठी शिवसेनेच्या धमाणे गटाच्या सुनिता शानाभाऊ सोनवणे यांनी आपले नामनिर्देशनपत्र दाखल केले तर उपाध्यक्ष पदासाठी काँग्रेसच्या बोरविहीर गटाच्या मोतनबाई पाटील यांनी अर्ज दाखल केला. यावेळी शानाभाऊ सोनवणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# वजनापूर, बुट्टेवाडगाव सोसायटीवर चेअरमन, व्हा. चेअरमन बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज




**लासूर स्टेशन :** वजनापूर, बुट्टेवाडगाव येथील सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमन व्हा चेअरमन पदाची निवडणूक आज गुरुवार दि तेरा रोजी सकाळी बिनविरोध करण्यात आली. वजनापूर संस्थेवर मनसुब चव्हाण यांची चेअरमन, व्हा चेअरमन म्हणून दशरथ कांबळे तर बुट्टेवाडगाव येथील सोसायटीच्या चेअरमनपदी बाबासाहेब खेडकर व्हाँ चेअरमन म्हणून सोमनाथ खेडकर बिनविरोध निवड करण्यात आली.

गंगापूर तालुकातील सर्वाधिक चर्चेत राहीलेल्या वजनापूर विविध कार्यकारी सेव सहकारी संस्थेची नुकतीच निवडणूक प्रक्रिया पार पडली होती. त्यात आ. प्रशांत बंब यांच्या नेतृत्वाखाल माजी सभापती संतोष पाटील जाधव याच्या. पॅनलनच्या 13 पैकी 13 जागा विजयी झाल्या होत्या. तसेच बुट्टेवाडगाव येथे 13 पैकी 10 जागा विजय झाल्या होत्या. त्या ठिकाणच्या चेअरमन, व्हा चेअरमन पदाची निवडणूक आज बिनविरोध संपन्न झाली.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून बेडवाळ यांनी काम बघितले, सचीव राजाराम शिरसाठ, पंडीत चव्हाण हे सहाय्यक म्हणून उपस्थित होते. बिनविरोध निवड झाल्याने ग्रामस्थानी जल्लोस केला. यावेळी नवनिर्वाचीत चेअरमन व्हाईस चेअरमनसह सर्वच संचालकाचा ग्रामस्थांच्या वतीने माजी अर्थ व बांधकाम सभापति संतोष पाटील जाधव यांनी सत्कार केला. या प्रसंगी माजी सैनीक रामचंद्र चव्हाण, रावसाहेब चव्हाण, अशोक चव्हाण बाळू चव्हाण, सोपान चव्हाण, अण्णासाहेब जाधव एकनाथ हजारे, मंदाबाई चव्हाण, सुनीता चव्हाण, योगेश चव्हाण अलका चव्हाण, मीनाबाई चव्हाणा, शिवम जाधव, बाळासाहेब सिद्धांत चव्हाण, चव्हाण, कम्युम शेख, संजय चव्हाण, विकास चहाल भगवान राजपूत, नारायण चव्हाण, कडू कांबळे, विष्णू चव्हाण कृष्ण चव्हाण, सागर चव्हाण, पवन चव्हाण रामदास चव्हाण, कर्डक आकाश चलवण, प्रभाकर चव्हाण, राजू कड, एकनाथ खाजकर, एकनाथ काकडे, लक्ष्मण चव्हाण, राजु दणके, उत्तम खाजी सुभाष वाघमारे, प्रवीण चव्हाण, साईनाथ चव्हाण, संतोष चव्हाण, अकुश चव्हाण उपस्थित होते.

# सुधीर कोर्टीकर आज सह्याद्री वाहिनीवर




आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मुळचे व जन्मता तिर्थक्षेत्र पंढरपूरचे पण ४० वर्षांपासून औरंगाबादवासी असलेले सुधीर कोर्टीकर या हरहुन्नरी कलावंतांनी अनेक कला अवगत केल्या आहेत. छायाचित्रकला , चित्रकला, पाककला, रांगोळी, मेहंदीकला, पत्रलेखनकला, कथालेखन, काव्यरचना, स्तंभलेखन, व्यंगचित्रकला, दिवाळीअंकाच्या मुखपृष्ठांचे पेंटिंग्ज, अनेक हस्तकला, दुर्मिळ नाणी व टपाल तिकिटांचा, काडेपेटी लेबलचा संग्रह, क्रिकेट क्षेत्रातील नैपुण्य, नाट्य कलावंत अशा त्यांच्या अंगी असणाऱ्या असंख्य कला गुण छंदाच्यावर प्रकाश टाकणारी मुलाखत ही दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीच्या वरुन प्रसारित करण्यात येणार आहे.दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीची ही मुलाखत सिने कलावंत रोहन गुजर यांनी घेतलेली आहे. शनिवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी रात्री ७.३० मिनिटांनी विचारांच्या पलिकडे यासदरात. सुधीर कोर्टीकरांची मुलाखत प्रसारित करण्यात येणार आहे.



# भेळ खाण्यासाठी पाणपोई फाटा येथे गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरालगत असलेले पाणपोई फाटा येथे श्री राम भेळ सेंटरला खवयाची गर्दी होत आहे. बनशेंद्रा येथील नवनाथ घुले या सुशिक्षीत बेरोजगाराने श्री राम भेळ सेंटरचा व्यावसाय सुरू केला असून नोकरीसाठी वणवणकरुन देखील नोकरी मिळाली नाही म्हणून आपला स्वताचा भेळ व्यवसाय सुरू केल्याने 500 ते 1000 रुपये रोज पडतो असे त्यांनी सांगितले. ही भेळ येवढी प्रसिध्द झाली आहे की, प्रत्येक प्रवाशी थांबून भेळ खाण्याचा आनंद घेतो.

# खदखद फेम प्रा. नितेश कराळे नांदुऱ्यात

आधुनिक केसरी न्यूज



**नांदुरा :** शेतकरी कन्या पुत्र एमपीएससी-यूपीएससी व शैक्षणिक विकास क्रांती संघटना नांदुराचे वतीने रविवार दिनांक16 आक्टोबरला नांदुरा अर्बन बँकेच्या डॉ. हेडगेवार सभागृहाध्ये संध्याकाळी सहा वाजता शिक्षणाचे महत्त्व आपल्या खास अस्सल वऱ्हाडी मायबोलीतून मुक्तपणे पटवून देणारे खदखद फेम प्रा. नितेश कराळे यांच्या शैक्षणिक मार्गदर्शन सोहळ्याचे आयोजन केले आहे. शेतकरी कन्या पुत्र शैक्षणिक संघटनेचे संस्थपक अध्यक्ष व शेतकरी पुत्र अभ्यासिकेचे प्रणेते राजेश गावंडे हे शेतकरी पुत्रांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच धडपड करीत असतात. शेतकरी पुत्र व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच ते निराशामुक्त, तणावमुक्त जीवन जगून त्यांनी आपले शैक्षणिक ध्येय प्राप्त करावे यासाठी कृ.ऊ.बा. समिती अंतर्गत राजेश गावंडे यांनी शेतकरी पुत्र अभ्यासिका स्थापन करून विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाशाची वाट दाखवण्याचा विडाच उचलला आहे. शेतकरी पुत्र अभ्यासिका हा पॅटर्न राज्यभर व्हावा तसेच जिल्हापरिषद शाळांना उभारी मिळावी यासाठीही शासन दरबारी त्यांची मागणी सुरू आहे. शेतकरी पुत्र व विद्यार्थ्यांसाठी ते सतत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असतात. विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे आणि त्यांच्या नव्या आशा पल्लवीत व्हाव्यात यासाठी प्रा नितेश कराळे सरांचे सहज सोप्या भाषेतील मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपयुक्त व दिशादायी ठरणारे असते .या मार्गदर्शन सोहळ्यात विद्यार्थ्यांनी गुणपत्रिकेतील गुणांपेक्षा गुणवत्ता महत्त्वाची मानून खऱ्या अर्थाने जिद्द, प्रयत्न व वेळेचा सदुपयोग कसा करावा तसेच आपल्यामध्ये आपले वेगळेपण निर्माण करण्याची साधने आहेत ती कशी वापरावी या विषयीचे मार्गदर्शन प्रा .कराळे करणार आहेत. प्रत्येक परीक्षेमध्ये यश मिळत नाही मात्र नापास झाल्यानंतर खचून न जाता जीवनाच्या परीक्षेत पास होता येतं हे प्रा.कराळे यांचे मार्गदर्शन ऑनलाईन युट्युब च्या माध्यमातून आपण पाहतो आहे .मात्र पहिल्यांदाच आपल्या नांदुरा शहरात त्यांच्या शैक्षणिक मार्गदर्शनाचे आयोजन शेतकरी कन्या पुत्र संघटनेच्या वतीने केले आहे. या कार्यक्रमाचा सर्व शाळातील विद्यार्थी व पालकांनी सदुपयोग करून घेण्यासाठी उपस्थित राहावे असे संघटनेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# सोयगाव तालुक्यात अनुदानित हरभरा बियाणे उपलब्ध

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुका व तालुक्याचा परिसरातील शेतकऱ्यांनी तालुका कृषि विभाग कार्यालय सोयगावयांचे मार्फत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कडधान्य कार्यक्रम सन २०२२ अंतर्गत हरभरा प्रमाणित बियाणे कृषिसेवा केंद्र सोयगांव येथे अनुदानावर उपलब्ध असून तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी वर्ग यांनी सदरील बियाणे परमीट घेऊन खरेदी करून पेरणी करावी असे आवाहन तालुका कृषि अधिकारी एस. जी. वाघ यांनी केले आहे. सदरील बियाणे खरेदीसाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांची माहिती कृषि पर्यवेक्षक एच. बी. देशमुख यांनी दिली यात प्रामुख्याने लाभार्थी यांचा ७/१२ उतारा, आधार कार्ड झेरॉक्स गरजेचे असून लाभार्थी यांनी बियाणे खरेदी करतेवेळी देणे बंधनकारक राहील. तसेच सदरील बियाणे हे राजविजय २०२ हे वाण असून कृभको कंपनीचे असून सदरील बियाणे ३० किलो पॅकिंग मध्ये उपलब्ध असून ३० किलो बॅगची किंमत अनुदान वगळून केवळ फक्त रू.१३५०/-सोयगाव तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार अशी माहिती कृषी विभागाच्या वतीने कृषी सहाय्यक हेमंत देशमुख यांनी बोलताना सांगितले.

# डॉ. सचिन चौधरी यांनी खोवला अंबाजोगाईच्या शिरपेचात मानाचा तुरा

## मेडीसीन विभागासाठीच्या MPSC परीक्षेत राज्यात दुसरा क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** आशिया खंडातील सर्वात मोठ्या असणा-या अंबाजोगाई येथील ग्रामीण रुग्णालयातील मेडीसन विभागातील रुग्णप्रिय डॉक्टर म्हणून जे अंबाजोगाई शहर-ग्रामीण आणि परिसरात परिचित असणा-या डॉ.सचिन चौधरी यांनी आपल्या विभागातील MPSC परिक्षा दिली होती. जिचा नुकताच निकाल लागला असुन त्यामधे संबंध महाराष्ट्र मेडीसन तथा औषध वैद्यकशास्त्र विभागाच्या सहयोगी प्राध्यापक पदासाठी घेतलेल्या परीक्षेत डॉ. सचिन चौधरी हे महाराष्ट्र राज्यातून दुसरे आले आहेत. एम.पी.एस.सी. ने निकाल व ज्येष्ठता यादी नुकतीच जाहीर केली. आतापर्यंत डॉ.चौधरी हे अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात शासनाकडून दिल्या जाणाऱ्या तात्पुरत्या पदोन्नतीवर कार्यरत होते. परंतु यापुढे आता ते पुर्णवेळ (कायमस्वरुपी) सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत होतील. डॉ. सचिन चौधरी यांनी औरंगाबादच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय पदवी (एमबीबीएस) व पुणे येथील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातून पदव्युत्तर पदवी (एम. डी. मेडिसीन) मिळविली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून ते सहाय्यक प्राध्यापक म्हणून अंबाजोगाई येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात औषध वैद्यक शास्त्रात सहा वर्षांपूर्वी सेवेत रुजू झालेले आहेत. शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाकडून दिल्या जाणाऱ्या तात्पुरत्या पदोन्नतीने ते सध्या याच महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अतिशय हुशार आणि मितभाषी असल्याने ते मित्र परिवार, सहकारी आणि रुग्णप्रिय डॉक्टर म्हणून सर्वत्र परिचित आहेत. मागच्या महिन्यात या पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परीक्षा घेतली. यात डॉ. सचिन चौधरी हे राज्यातून दुसरे आले असुन त्यांनी संपादीत केलेल्या या अद्वितीय यशामुळे अंबाजोगाईच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असल्याने त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षक, व्यापारी, निरनिराळ्या स्तरातील लोकप्रतिनिधी, मित्रमंडळी, रुग्णालय-महाविद्यालय आणि निवासी प्रभागातील नागरिकांसह सर्वत्र स्वागत होत आहे. तर सोशल मीडियावरुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याच्या शासन निर्णयाविरोधात रा.कॉं. आक्रमक

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना शासन निर्णयाविरोधात निवेदनाद्वारे आंदोलनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** राज्यशासनाने नुकताच २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा अन्यायकारक निर्णय घेतला असल्याने या निर्णयाविरोधात संपूर्ण महाराष्ट्रात असंतोष निर्माण झाला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील जिल्हा परिषदांच्या शाळांवर ही 'टांगती तलवार' असून राज्य सरकारच्या या अन्यायकारक निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि पालकांची चिंता वाढली आहे. तरी कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा अन्यायकारक निर्णय राज्य सरकारने तात्काळ मागे घ्यावा अन्यथा या प्रश्नावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष तीव्र जनआंदोलन करेल. या मागणीचे निवेदन उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे.




राज्यातील कमी पटसंख्या असलेल्या शाळांबाबत शिक्षण विभागाकडून आढावा घेतला जात आहे. प्राप्त माहितीनुसार, अनेक जिल्ह्यांकडून अशी माहिती आली असून, अशा शाळांची संख्या वाढल्याचे सांगण्यात येते. कमी पटसंख्या असलेल्या सरकारी शाळा बंद करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असून, त्याविरोधात विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांच्या मधून संताप व्यक्त होत आहे.

जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी हेगाव, वाडी, वस्ती, तांड्यावरील गोर-गरीब, सर्वसामान्य, मोज मजुर व ऊसतोड कामगारांची मुले आहेत. पटसंख्येचे कारण देवून शाळा बंद करणे म्हणजे शिक्षण हक्क कायद्याची पायमल्ली करण्यासारखे आहे. तो निर्णय शासनाने माघे घ्यावा यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने उपजिल्हाधीकारी यांना गुरूवारी निवेदन देण्यात आले. कमी पटाच्या शाळेतील शिक्षकांची यादी शासनाने मागवली आहे. शाळा बंद करतांना भौगोलीक स्थिती, पर्यायी शाळेतील अंतर किती असावे. कोणते निकष याचा स्पष्ट उल्लेख शासनाने काढलेल्या पत्रामध्ये कुठेच दिसुन येत नाही. शाळा बंद झाल्यातर ग्रामीण भागातील पुढील पिढी वाया जाणार आहे. म्हणून २० पेक्षा पटसंख्या कमी असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने मागे घ्यावा व जिल्हा परिषद शाळेचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करावा. असे नाही झाले तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी व शिक्षण प्रेमी तर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल असा ईशारा राष्ट्रवादीच्या वतीने उपजिल्हाधीकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी मा.आ. संजय दौंड, पृथ्वीराज साठे, मा. नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, डॉ.नरेंद्र काळे, तालुकाध्यक्ष ताराचंद शिंदे, डॉ. राजेश इंगोले, बबन लोमटे, तानाजी देशमुख, सुनील व्यव्हारे, दिनेश भराडीया, दत्ता सरवदे, गोवींद पोतांगले, संतोष शिनगारे, अजीत देशमुख, महादेव आदमाने, वाजेद खतीब, उज्जैन बनसोडे, भीमसेन लोमटे, सय्यद ताहेरसह राष्ट्रवादीचे बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानचा 25 वा वर्धापनदिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ज्येष्ठ पशु वैद्य प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज पत्रित पशुवैद्यक संघटना व विभागाच्या वतीने 25 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ नरेश गीते माजी सनदी अधिकारी, तथा संचालक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पारगावकर सर, माजी विभाग प्रमुख, मंगलमूर्ती शास्त्री, दिलीप थोरात साहेब, जे.के. जाधव, डॉ. अरविंद मुळे अध्यक्ष ज्येष्ठ पशु वैद्य प्रतिष्ठान लाभले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली. वर्धापन दिनाचे औचित्य साधून तांत्रिक सेमिनार चेही आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. अरविंद देशपांडे, डॉ. रवींद्र डावरे डॉ अरविंद मुळे, डॉ. अशोक दिवाण, डॉ. अतुल टापर व इतर पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. नियोजन बद्ध कार्यक्रमाची सुरुवात डॉ अरविंद मुळे यांच्या प्रास्ताविकाने झाली. सुरुवातीला औरंगाबाद विभागाचे पशुसंवर्धन सह आयुक्त डॉ संजय गायकवाड यांनी त्यांनी आता पर्यंत अनेक पशु पक्षी श्वानपदावर केलेल्या शस्त्रक्रिया व त्यातून बरे झालेल्या प्राण्यांचे आनंदाने बागडणे याचे व्हिडिओद्वारे प्रदर्शन करून मार्गदर्शन केले. त्यानंतर काही मान्यवरांचा उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल प्रतिष्ठान च्या वतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.त्यामधे प्रामुख्याने डॉ. संजय गायकवाड, प्रादेशिक सह आयुक्त औरंगाबाद यांचा उत्कृष्ठ पशुवैद्यक तर डॉ. नितीन मार्कंडेय अधिष्ठाता पशुवैद्यकीय महाविद्यालय परभणी यांचा उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून सन्मान चिन्ह देवून गौरव करण्यात आले. डॉ. श्याम जावळीकर माजी अतिरिक्त आयुक्त पुणे यांना प्रतिष्ठानच्या वतीने मानाचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर डॉ. भिलेगावकर माजी विभाग प्रमुख यांच्याकडून दिले जाणारे सुवर्ण पदकाचे या वर्षीचे मानकरी कु. डॉ. वाकळे यांना देण्यात आले. डॉ. होन्नालिकर, डॉ. बारहाते, डॉ. आबा साहेब डख, mahavet चे डॉ. डी. पी. देशमुख यांचाही सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट पशुपालक म्हणून रासने मानवत, पांजरपोळ (गिर) यांचाही मान्य वरांचे हस्ते सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. पहिल्या सत्राचे आभार प्रदर्शन डॉ. बी. आर. कांबळे यांनी केले तर सूत्र संचालन चौरे मॅडम यांनी केले. दुसऱ्या सत्रात डॉ मार्कंडेय यांनी देशभर पाधुधनास त्रासदायक लंपी रोगा बाबत सविस्तर माहिती देवून उपचार पद्धतींमध्ये प्रतिजैविक कमीत कमी वापरण्यावर भर दिला तसेच प्रत्येक जिल्हा परिषदेने ओझोन मशीन खरेदी करून त्याचा वापर केल्यास जास्त फायदा होतो असे म्हटले. डॉ. रोहित धुमाळ पशुधन विकास अधिकारी विभागीय रोग अन्वेषण विभाग, यांनी विविध प्रकारच्या रोग निदानाची माहिती दिली.डॉ होन्नालीकर यांनी दुग्ध व्यवसायातील बारकावे व व्यवस्थापन या बाबत सखोल मार्गदर्शन केले. विरबॅक कंपनीचे अमित बोराळकर, mycon चे शेळके, राकेश फार्माचे डॉ. अभिजित तळेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी सहकार्य करून प्रॉडक्ट विषयी माहिती दिली.





# साहित्यिक सचिन कुसनाळे यांना राज्यस्तरीय वैचारिक साहित्य पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या सहयोगाने सूर्यांश साहित्य व सांस्कृतिक मंच,चंद्रपूर आयोजित 3 रे राज्यस्तरीय साहित्य संमेलन नुकतेच चंद्रपूर येथे पार पडले. सदर कार्यक्रमामध्ये सांगली येथील साहित्यिक सचिन कुसनाळे यांच्या 'विश्ववाद' या ग्रंथास वैचारिक साहित्य प्रकारातून हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक तसेच 95 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री भारत सासणे व लोककवी प्रा.इंद्रजित भालेराव यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास गडचिरोली विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत, चंद्रपूर येथील प्राचार्य डॉ. प्रमोद काटकर,मराठी विभाग प्रमुख डॉ. विद्याधर बन्सोड, गझलकार सुनील बावणे,नाशिक येथील बँक व्यवस्थापक व साहित्यिक श्री विश्वास ठाकूर, मंडळाचे अध्यक्ष इरफान शेख,सचिव प्रदिप देशमुख गीता रायपूरे यांच्यासह अनेक साहित्यिक, पदाधिकारी, साहित्य रसिक उपस्थित होते. महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे यांचे ते साहित्य क्षेत्रातील सहकारी होत. 'विश्ववाद' या पुस्तकातून श्री सचिन कुसनाळे यांनी 'एक जग-एक देश-एक घटना' कशी प्रत्यक्षात अस्तित्वात येऊ शकते. स्ववादातून विश्ववादा'कडे कसे जाता येईल व 'जय जगत' ही संकल्पना प्रत्यक्षात कशी साकारता येईल याविषयी सैद्धांतिक मांडणी केली आहे.श्री कुसनाळे यांनी अनेक वैचारिक ग्रंथांचे लेखन केले आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी 'स्वातंत्र्यायण' हा स्वातंत्र्याच्या व्यवस्थापनविषयक ग्रंथही प्रकाशित केला आहे.

# पिशोर पोलीस ठाण्याच्या सहायक पोलिस निरीक्षकाची चौकशी करून कारवाई करा

## भारतीय दलित कोब्रा संघटनेकडून उपोषणाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील पिशोर येथील नेहमी चर्चेत असणारे पोलिस ठाणे पिशोर येथील पोलीस ठाण्याच्या सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती शिंदे यांच्या कारभाराची चौकशी करुन आठवडा भरात कारवाई करण्यात यावी अन्यथा बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा भारतीय दलित कोब्राच्या महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्षा सुमित्राताई खंडारे यांनी दिला आहे.
स्थगित करण्यात आले होते. येत्या आठवड्यात श्रीमती शिंदे यांच्यावर चौकशी करुन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी कारवाई करावी, असा इशाराही दैनिक आधुनिक केसरी प्रतिनिधीशी बोलताना सुमित्राताई खंडारे यांनी माहिती दिली आहे. या वेळी संघटनेकडून पोलीसांकडून होणारा त्रास आणि फिर्यादीला सापत्न वागणूक तसेच आरोपीला अभय देणे, खोटे गुन्हे दाखल करणे, तक्रार देणाऱ्यावरच गुन्हे दाखल करणे, अवैध धंद्यावर दुर्लक्ष करणे, असे प्रकार घडल्यामुळे आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाचाच एक भाग म्हणून आठवड्याभरात वरिष्ठांनी दखल घेऊन कारवाई केली नाही तर पोलीस अधिक्षक ग्रामीण कार्यालय टीव्ही सेंटर येथे उपोषण व आंदोलन करण्यात येणार असल्याचेही पत्रकात म्हटले आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# परतूर आगाराच्या दुर्लक्षामुळे समस्या जशाच्या तशा

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील आष्टी सर्कलमध्ये असलेली भगवानबाबा नगर, दत्तनगर, पळशी, आनंदगाव या गावांमधील विद्यार्थ्यांसाठी शाळेत जाण्यासाठी सोय नसल्याने गोरगरीब मुले-मुली शिक्षणापासून वंचित राहत आहेत. यासाठी जय भगवान महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष दादाराव चौरे यांनी दिनांक 11/8/2022 रोजी एस. टी. महामंडळ परतूर आगरास निवेदन देऊन या परिसरातील गुणवंत विध्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेऊ नका, मागील वर्षी पळशी येथील गरीब कुटुंबातील होतकरू मुलगा केंद्र सरकारच्या सेवेत सैनिक म्हणून कार्यरत आहे, अशा गुणवंत विध्यार्थ्यांना प्रेरणा देऊन शाळा, कॉलेज येण्यासाठी बस सेवा उपलब्ध करून दिली पाहिजे, जेणेकरून गोरगरिबांची मुले-मुली मोठ्या क्षेत्रात आपले नाव करतील व गावचे नाव घडवतील. यासाठी एस. टी. महामंडळाने लक्ष घातले पाहिजे, पण आगार प्रमुखाकडून कसलीही हालचाल झालेली दिसून येत नाही तर जूनपासून शाळा चालू झाल्या असून आता दिवाळीच्या सुट्ट्याही लागल्या आहेत. मात्र मुलांना शाळेत जाण्याची सोय काही झाली नाही. ज्याच्याकडे सायकल आहेत ते सायकलवर जातात पण काही लहान मुले मुली असल्याने सायकलवर आष्टीपर्यंत येऊ शकत नाही. तर आष्टी येथून शेगाव पंढरपूर महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असल्याने त्यांचे पालक त्याना भीती अभावी शाळेत पाठवत नाही यामुळे जय भगवान महासंघाने निवेदन दिले. पण समस्या जशाच तशी जय भगवान महासंघ एसटी महामंडळाकडे निवेदन सादर आहे की लवकरात लवकर परतूर ते आनंदगाव ही बस सकाळी सात वाजता विद्यार्थ्यांसाठी सुरू करून देण्यात यावी.



# साधना गोपनारायण यांना रमाई गौरव पुरस्कार



आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** वाशिम येथील 27 मे 2022 रोजी झालेल्या रमाई चळवळीचे साहित्य संमेलन नवे या साहित्य संमेलनामध्ये अकोला जिल्ह्यातील खेकडी या छोट्याशा गावातील रहिवासी असलेल्या सौ साधना रमेश गोपनारायण यांना रमाई गौरव पुरस्कार 2022 ने गौरवण्यात आले. साधना गोपनारायण यांच्या गावामध्ये बांधण्यात आलेल्या बुद्ध विहाराच्या कामासाठी त्यांचा सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्र भरातील गावोगावी गल्लोगल्ली दांड्या वर फिरवून त्यांनी व त्यांचे पती बोधाचार्य रमेश गोपनारायण आहे यांनी मिळून या बुद्ध विहाराच्या बांधकामासाठी दहा, पाच रुपयापासून मदत मिळवून आणि आपल्या श्रमदानातून हे बुद्धविहार उभारले आहे. आपल्या दैनंदिन जीवनातील प्रत्यक्षात त्यांनी सतत अनेक वर्षापासून धम्म कार्यासाठी वाहून घेतले आहे. गावातील उपासिका महिला संघाला बुद्ध विहारात आणणे, त्यांच्याकडून बुद्ध वंदना-धम्मवंदना वगैरे परित्राण पाठ म्हणून घेणे आणि स्वतः सुद्धा तिथे बसून त्यांना वेळ देणे हे कार्य ते सतत करत असतात. स्वतःच्या तब्येतीची काळजी न करता हे कार्य करीत असताना त्यांना धम्म कार्य केल्यामुळे समाजासाठी काहीतरी आपण करतो या गोष्टीचे मोठे समाधान असल्याचे ते बोलताना सांगतात. मधुमेहासारख्या आजारालासुद्धा त्या कधी न जुमानता आजही धम्म कार्यामध्ये पाठीमागे न राहता सतत आपल्या पती रमेश गोपणरायन यांना सोबत घेऊन किंबहुना त्यांच्या खांद्याला खांदा लावून धम्मकार्यात सक्रिय सहभाग नोंदवतात अशा साधना रमेश गोपनारायण यांच्या कार्याला सलाम.

औरंगाबाद येथील भारत शिरसाट आणि रेखा मेश्राम यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या रमाई चळवळीच्या साहित्य संमेलनामध्ये प्रा. भारत शिरसाट आणि प्रा. डॉ. रेखा मेश्राम यांनी त्यांना रमाई गौरव पुरस्काराने सन्मानित केले त्याबद्दल उभयतांचे खूप खूप आभार. आजच्या आधुनिक जगामध्ये शिक्षणाला जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षाही सुसंस्कृतपनाला जास्त महत्त्व आहे ही बाब या अशिक्षित पण सुसंस्कृत महिलेच्या संदर्भात लक्षात आल्याशिवाय. शिकलेला ना सुद्धा साधना गोपनारायण यांच्याकडून काहीतरी शिकण्यासारखी बाब या माध्यमातून शिकता येईल.

# जळगाव जिल्हा दूध संघातील चोरीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यास पोलीस घाबरतात : जयंत पाटील

## आमदार एकनाथ खडसे यांची उपोषणस्थळी जयंत पाटील यांनी घेतली भेट

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** दूध संघात अपहार नव्हे; तर चोरी झाली आहे. यामुळे तात्काळ गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे. मात्र पोलीस अधिक्षकांवर सत्ताधाऱ्यांचा दबाव असल्यामुळे गुन्हा दाखल करण्यासाठी टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केला. जळगाव जिल्हा दुध संघात झालेल्या चोरीप्रकरणी दुध संघाच्या कार्यकारी संचालकांनी तक्रार केली असून २४ तास उलटल्यानंतरही आरोपींवर गुन्हा दाखल करून घेतला जात नाही. आरोपींवर गुन्हा दाखल केला जावा या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आमदार एकनाथ खडसे हे गुरुवार संध्याकाळपासून जळगाव शहर पोलीस कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. आज जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आमदार एकनाथ खडसे यांची उपोषणस्थळी जावून भेट घेतली व त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला शिवाय जळगाव पोलीस अधिक्षक डॉ. प्रविण मुंढे यांची भेटही घेतली. जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक प्रवीण मुंढे यांच्यावर प्रचंड दबाव आहे. गुन्हा दाखल करण्यात त्यांना भीती वाटत आहे असे दिसतेय. पोलिस स्वतः च्या कर्तव्यात कमी पडत आहेत आपले कर्तव्य टाळत आहेत असे स्पष्ट करतानाच नव्याने आलेले सरकार कायदा कशापद्धतीने धाब्यावर बसवत आहे हे जळगाव चोरी प्रकरणावरून दिसत आहे असा आरोपही जयंत पाटील यांनी यावेळी केला. प्रविण मुंढे यांची भेट घेतल्यावर त्यांच्यावर राजकीय प्रचंड दबाव आहे म्हणून ते गुन्हा दाखल करुन घ्यायला घाबरत आहेत असेही जयंत पाटील यावेळी म्हणाले. दरम्यान २४ तास उलटूनही आरोपींवर गुन्हा दाखल होत नाही याचा अर्थ ज्यांच्यावर आरोप आहेत ते लोक फरार होण्यासाठी पोलिसांकडून दिरंगाई होत असल्याचा आरोपही जयंत पाटील यांनी केला.

# चार दिवसाआड पाणी पुरवठा करून मोकाट कुत्रे व डुकरांचा बंदोबस्त करा : शिवसेनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** शहराला पाणीपुरवठा करणारा धनेगाव तलाव तसेच काळवटी तलाव जवळपास भरला आहे मात्र शहरात आठ ते दहा दिवसाला पाणी पुरवठा होत आहे. महिन्यातुन तीन ते चार वेळेस पाणी पुरवठा करावा. तसेच शहरात वाढलेल्या मोकाट कुत्रे व डुकरे यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी अंबाजोगाई शिवसेनेच्या वतीने शहर प्रमुख गजानन मुडेगावकर यांनी केली आली. शहराला पाणीपुरवठा करणारा धनेगाव तलाव तसेच काळवटी तलाव जवळपास भरला आहे मात्र शहरात आठ ते दहा दिवसाला पाणी पुरवठा होत आहे. पाणीपट्टी मात्र महिन्याची घेऊन नागरिकांची लुट केली जाते. तेंव्हा चार दिवसाआड पाणीपुरवठा करावा तसेच अंबाजोगाई शहरातील सर्वच भागात विशेषतः जुन्या शहरातील



गल्ली बोळामध्ये घाणीचे साम्राज्य वाढले असून यामुळे या भागात मोकाट डुकरे व कुत्रे यांचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून घराबाहेर निघणेही अवघड झाले आहे. काही वेळा तर अनेक डुकरे घराच्या आत मध्ये शिरुन नासाडी करत आहेत. तर कुत्र्याचे टोळके रात्री किंवा सकाळच्या वेळेला नागरिकांवर धावा घेऊन चावा घेतायेत. यासंदर्भात अनेक वेळा संबंधित अधिकारी-कर्मचा-यांना तोंडी माहिती दिली असता या संबंधात आम्ही काही करू शकत नाहीत असेच अपेक्षित नसलेली उत्तरे सातत्याने मिळत असल्याने अखेर आज लेखी निवेदन देऊन आपण तात्काळ याबाबत उपयोजना करावी अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र असे शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल व याची सर्व जबाबदारी आपणावर राहील असेही या निवेदनात म्हटले आहे.

या वेळी जिल्हा संघटक राजेभाऊ लोमटे, तालुका प्रमुख मदनलाल परदेशी, महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख जयश्रीताई पिंपरे, तालुका प्रमुख रेखाताई घोबाळे, शहर प्रमुख वैशालीताई वाघमारे, उपशहर प्रमुख शिवकांत कदम, माजी उपनगराध्यक्ष तथा शहर संघटक अशोक हेडे, शहर समन्वयक बाबा भिसे, मा.शहर समन्वयक अर्जुन जाधव, माजी तालुकाप्रमुख रमेश टेकाळे, युवासेनेचे अभिमन्यू वैष्णव, ॲड.विशाल घोबाळे, रत्नेश्वर वाघमारे, सोशल मीडिया प्रमुख नागेश सावंत, बाळासाहेब वाघाळकर आदींसह ठाकरे प्रणित शिवसैनिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# आष्टी परिसरात कापूस-सोयाबीन पिकाचे परतीच्या पावसाने नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील आष्टी व आष्टी परिसरातील सोयाबीन ला मोठा फटका बसला परिसरातील परतीच्या पावसाने पिकांची मोठी नुकसान केली आहे त्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी मात्र कडूच हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून घेतला आहे आष्टी परिसरात कधी पावसाच्या उघडीने तर कधी सततच्या पावसाने खरीप हंगाम धोक्यात आला आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. सध्याच्या परिस्थितीत काढणीला आलेले सोयाबीन पिकाचे पावसाने नुकसान होत आहे. परिसरात मागील काही दिवसापासून परतीच्या पावसास सुरुवात झाली त्यातच मंगळवारी (दि.११) व बुधवारच्या पावसाने खरीप पिकांचे आधिक नुकसान झाले आहे शेतात सोयाबीनची काढणी सुरू असलेल्या मोठी तारांबळ निर्माण झाली आहे शेतातील काढून ठेवलेल्या सोयाबीनच्या गंजिमध्ये पाणी घुसले वारा विजेच्या गडगडासह पाऊस झाल्याने कापूस पीक ही आडवे झाले आहे कापासाच्या वाती झाल्या आहेत परिसरात गेल्या काही दिवसापासून परतीच्या प्रवासात परतीच्या पावसाने खरीप पिकांची नासाडी होत आहे उत्पदनसाठी खर्च मोठ्या प्रमाणात झाला निम्मे उत्पादन घटलेले परिस्थिती अवघड झाल्याने शेतकरी चिंतेचे वातावरण तयार झाले आहे प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई अनुदान जाहीर करावे अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.





# मोबाईल चोरीने उघडकीस आणली सुपारी, दोघे अटकेत, तिसऱ्याने घेतला गळफास

## वीरगाव पोलिसांचा कौतुकास्पद तपास, पोलीस अधीक्षकांकडून पोलिसांना रिवॉर्ड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शेतीच्या वादातून त्रस्त असलेल्या शेतकऱ्याने चुलत भावाला अद्दल घडवण्यासाठी रेकॉर्डवरच्या गुन्हेगाराला सुपारी देत जबरी चोरी घडवून आणली पण मारहाण करत जबरी चोरी करताना सुपारी बहाद्दराने चोरलेल्या मोबाइल मध्ये सहा महिन्यानंतर सिम कार्ड टाकले व अलगद पोलिसांच्या जाळ्यात अडकला व पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. दोघांना बेड्या ठोकल्या तर तिसऱ्या गुन्हेगाराने गळफास घेतल्याची माहिती पोलिसांना कळाली त्याचा तपास पोलीस करत आहेत. या कारवाई नंतर पोलीस अधीक्षक मनीष कलवानीया यांनी वीरगाव पोलिसांना रिवॉर्ड जाहीर केल्याची माहिती दिली योगेश मधुकर हरणे (२८) रा. जातेगाव ता. फुलंब्री व पोपट बापूराव राऊत रा. शिरसगाव अशी अटक आरोपीची नावे आहेत. या पैकी पोपट राऊतचे व त्याचा चुलत भाऊ संजय भाऊराव राऊत यांचे शेतीचे वाद न्याय प्रविष्ट आहेत तरीही



चुलत भावाला कायमचा धडा शिकवण्यासाठी पोपट राऊत ने रेकॉर्डवरचा गुन्हेगार योगेश हरणे याला ५० हजारामध्ये भावाच्या घरी जबरी चोरी करून मारहाण करण्याची सुपारी दिली त्या प्रमाणे योगेश हरणे याने त्याचा साथीदार आकाश शिरसाठ रा. गंगापूर याला सोबत घेत शिरसगाव शिवारात २१ मे २२ रोजी मध्यरात्री संजय राऊत यांच्या शेतावर जाऊन संजय सहित मुलगा संतोष व पत्नी पुष्पा यांना चाकूने मारहाण मारहाण करत १० हजार रु रोख व ४८ हजार रु चे दागिने मोबाइल असा ऐवज लंपास केला या प्रकरणी २२ मे रोजी वीरगाव पोलिस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झालेला आहे. या प्रकरणाचा तपास एपीआय शरश्चन्द्र रोडगे करत असताना चोरलेल्या मोबाईल मध्ये सहा महिन्यानंतर योगेश हरणे याने सिम कार्ड टाकले तसे रोडगे यांनी फुलंब्री परिसरातून योगेश हरणे याला ताब्यात घेत चौकशी केली असता त्याने संजय राऊत यांचा चुलत भाऊ पोपट राऊत याने सुपारी दिल्यामुळे आपण हा गुन्हा जोडीदार आकाश शिरसाठ यांच्या मदतीने केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोपट राऊत याला ताब्यात घेत चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. या गुन्ह्यातील तिसरा गुन्हेगार आकाश शिरसाठ याने दोन महिन्यापूर्वीच गळफास घेत आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली पण त्याचे डेथ सर्टफिकेट मिळाल्या शिवाय तो मयत झाल्याचे सिद्ध होणार नाही, असे सूत्रांनी सांगितले. वरील कारवाई पोलीस अधिक्षक मनीष कालवानीया, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. पवन बनसोड, उपविभागीय अधिकारी शिलवंत नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय शरश्चंद्र रोडगे, पीएसआय नवनाथ कदम, पोलीस कर्मचारी गणेश जाधव, सतीश गायकवाड यांनी पार पाडली.

# जांब समर्थ चोरीप्रकरण; पोलिसांना माहिती देणाऱ्यास २ लाखांचे बक्षीस

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जांब समर्थ येथील श्रीराम मंदिरातील गाभाऱ्यातून संत रामदास स्वामी पूजा करत असलेल्या श्रीराम, लक्ष्मण, सीता, हनुमान या देवतांच्या पंचधातूच्या मूर्ती चोरी प्रकरणी उपयुक्त माहिती देणारास २ लाख रु चे बक्षीस देण्याची घोषणा जालना पोलीस अधीक्षक अक्षय शिंदे यांनी केली. वरील प्रकरणी घनसांवगी पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. जालना जिल्ह्यातील रेकॉर्डवरचे १ हजार गुन्हेगार पोलिसांनी तपासले आहेत. तसेच सातारा जिल्ह्यात या प्रकरणी शोध लागतो का? याचीही पडताळणी केल्याचे शिंदे म्हणाले २१ऑगस्ट २२ रोजी ही चोरीची घटना घडली होती. त्यानंतर पोलीस तपासात म्हणावे तसे धागेदोरे सापडत नसल्यामुळे पोलिसांनी वरील भूमिका घेतल्याचे शेवटी शिंदे यांनी सांगितले पोलीस अधीक्षक कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश धोंडे यांनी प्रसिध्दी पत्रकात नागरिकांना आवाहन केले की, गुन्हेशाखा पोलीस निरीक्षक सुभाष भुजंग (९९२३४२२७००)एपीआय योगेश धोंडे (९९२३६०००६०)पीएसआय प्रमोद बोडले (९५७९०२१७२३) या क्रमांकावर कोणाकडे उपयुक्त माहिती असल्यास संपर्क करावा.

# विद्यार्थ्याच्या मृत्यूप्रकरणी चालकाविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जि. प. मैदानात १० ऑक्टोबर रोजी झालेल्या अपघातातील मयत मुलाच्या वडिलांच्या फिर्यादीवरून क्रांतिचौक पोलीस ठाण्यात आज बस चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे, अशी माहिती पो.नि.डॉ. गणपत दराडे यांनी दिली. कपिल लोखण्डे असे या बस चालकाचे नाव आहे. बसचालक कपिल लोखण्डे याने निष्काळजीपणे बस चालवून हरिओमच्या मृत्यूस कारणीभूत झाला.



# नागरी बँकामध्ये भरतीची प्रक्रिया सुटसुटीत करावी: किशोर शितोळे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सहकार मंत्री अतुल सावे साहेबांची भेट देवगिरी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे व मराठवाडा बँकिंग फेडरेशनचे अध्यक्ष मा. सत्यनारायनजी लोहियाजी, संदीप पंडित, जयंत कुलकर्णी यांचे सोबत घेतली. सहकारी बँका मध्ये लिपिकांच्या खूप जागा रिक्त आहेत, पण सरकार नियुक्त कंपन्या मार्फतच लेखी परीक्षा (90 गुणांची), व बँकेने10 गुणांची तोंडी परीक्षा घ्यावी, असा नियम केला आहे. या कंपन्यांना अनुभव, परिक्षा नियोजन क्षमता, पारदर्शकता याबद्दल बँकांना विश्वास येत नाही. TET व इतर परीक्षांमध्ये झालेले घोटाळे झालेले आहेतच. त्यामुळे अनेक वर्षांपासून कोणतीच बँक लिपिक नियुक्त्या करीत नाहीत. तरी शासनाने या नियुक्त्यांना त्यांच्या स्तरावर पूर्वीप्रमाणेच परवानगी दयावी, फार तर पारदर्शकतेसाठी नियमावली अधिक कडक करावी, ज्यामुळे 8000 पेक्षा जास्त रिक्त जागा भरल्या जाऊ शकतात, आणि याचा कसलाही आर्थिक भार शासनाला नाही, उलट 8 -10 हजार युवकांना रोजगार उपलब्धी होईल. यावर सहकार मंत्री अतुल सावे साहेबांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, आम्ही लवकरच केबीनेट बैठकीत असा निर्णय करतो, असे आश्वासन दिले.

# सिग्मा ग्रुप ऑफ हॉस्पिटलमध्ये पहिले यशस्वी बोन मॅरो प्रत्यारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** युनायटेड सिग्मा ग्रुप हॉस्पीटलमध्ये नुकतीच पहिले यशस्वी बोन मॅरो प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या संपन्न झाली. सदरील रुग्णाचे वय ३५ वर्षे असुन जून २०२१ मध्ये या रुग्णाच्या आजाराचे निदान झाले त्यांना 'प्लाझ्मा सेल ल्युकेमिया' हा आजार झाला होता. त्यांनी बाहेरील केंद्रात केमोथेरपी व रेडीओथेरपी घेतली होती. त्या नंतर या रुग्णांनी युनायटेड सिग्मा ग्रुप हॉस्पीटलच्या डॉ. श्रुती तोष्णीवाल (हेमॅटो ऑंकोलॉजिस्ट) यांच्याशी संपर्क साधला. डॉ. श्रुती तोष्णीवाल यांनी संपूर्ण तपासण्या व मुल्मापन केल्यानंतर असे निदर्शनास आले कि सदरील रुग्ण हा बोन मॅरो प्रत्यारोपणासाठी योग्य आहे, प्रत्यारोपण न करता यावर उपचार केले असता हा आजार पुन्हा पुन्हा परत आला असता व नंतर या आजाराने केमोथेरीपीला सुध्दा प्रतिबंधित झाला असता. डॉ. श्रुती तोष्णीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या सहकाऱ्यांनी या रुग्णांचे स्टेमसेल ॲफेरेसीसची २ आवर्तन केली आणि निरोगी स्टेम पेशी गोळा केल्या, यात डॉ. श्रुती तोष्णीवाल यांना डॉ महेंद्रसिंग चव्हाण व डॉ. नंदिनी तिवारी यांचे सुध्दा सहकार्य मिळाले. शस्त्रक्रियेच्या दरम्यान कुठल्याही प्रकारची गुंतागूंत न होता अंत्यत यशस्वीपणे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. सिग्मा ग्रुप ऑफ हॉस्पीटलचे सी.एम.डी. डॉ. उन्मेष टाकळकर व डॉ. मनिषा टाकळकर यांच्या दूरदर्शी प्रयत्नामुळे त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे ही शस्त्रक्रिया अंत्यत सुलभपध्दतीने झाली. सिग्मा ग्रुप हॉस्पीटलमध्ये रक्तांचे आजार व कर्करोगांशी संबंधित विकाराचे मुल्यांकन, व्यवस्थापण व निदान करुन त्याच्यावर तत्परतेने उपचार केले जातात, अशी माहिती डॉ. अजय रोटे यांनी दिली.



# पुण्यातून सुटणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांचे बुकिंग फुल्ल

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दिवाळी काही दिवसांवर आल्यामुळे नागरिकांकडून सुट्टीचे नियोजन करण्यास सुरुवात झाली आहे; पण पुण्यातून सुटणाऱ्या बहुतांश रेल्वे गाड्याचे बुकिंग 'फुल' झाल्यामुळे गावी कसे जायचे, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. रेल्वे बोर्डाकडे पुण्यातून राज्याच्या विविध भागांत दिवाळीसाठी विशेष रेल्वे गाड्या सोडाव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. पुणे शहर व परिसरात नोकरीनिमित्ताने राज्यातील विविध भागांतील नागरिक आले आहेत; तसेच पुण्याला 'विद्येचे माहेरघर', 'आयटी हब' म्हणूनदेखील ओळखले जाते. त्यामुळे पुण्यात राज्याच्या विविध भागांतील विद्यार्थ्यांची संख्यादेखील मोठी आहे. हे विद्यार्थी दिवाळीत १० ते १५ दिवस सुट्टी घेऊन गावी जात असतात. त्यामुळे पुणे येथून सुट्टीच्या कालावधीत विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात जाणाऱ्या नागरिकांचे प्रमाण अधिक आहे. ADV- स्मार्टफोनवर 40% पर्यंत सूट देऊन, तुमच्या बजेटमध्ये बसणारे योग्य मोबाईल शोधा आणि त्यासोबत अतिरिक्त ऑफर मिळवा. पुणे स्टेशन येथून दररोज अडीचशेपेक्षा जास्त गाड्या ये-जा करतात. त्यापैकी रेल्वे गाड्या पुण्यातून सुटतात. सध्या या सर्व रेल्वेगाड्यांचे दिवाळीसाठीचे बुकिंग फुल झाले आहे. त्यामुळे दिवाळी सुट्टीनिमित्त गावी जाणाऱ्या नागरिकांसमोर नियोजन करताना अडचणी निर्माण होत आहेत. मध्य रेल्वेकडून गणेशोत्सव, छटपूजा आणि उन्हाळी सुट्टी विशेष रेल्वे गाड्या चालविल्या जातात. याच प्रकारे दिवाळीसाठी विशेष रेल्वे गाड्या सोडण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

**प्रवाशांना 'खासगी'शिवाय पर्याय नाही**

दिवाळीच्या निमित्ताने बरेच नागरिक गावी जातात. त्यामुळे या काळात रेल्वे, एसटी बस फुल असतात. त्यामुळे खासगी ट्रॅव्हल्स चालकांकडून तिकीट दरात दुपटीने वाढ केली जाते; पण रेल्वेतून प्रवास केल्यास नागरिकांना खूपच स्वस्तात गावी जाता येते. मात्र, रेल्वेचे बुकिंग 'फुल' झाल्यामुळे नागरिकांना आता खासगी ट्रॅव्हल्सशिवाय पर्याय राहिलेला नाही. त्यामुळे त्यांना मोठी आर्थिक झळ सोसावी लागणार आहे.




# दिवाळीसाठी एसटीच्या १५०० जादा गाड्या



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दिवाळी आणि जोडून येणाऱ्या सुट्ट्यांचा कालावधी पाहता कुटुंबिय आणि मित्र परिवारासह पर्यटनासाठी जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने यंदा राज्यभरात 'दिवाळी स्पेशल' १४९४ जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. २१ ते ३१ ऑक्टोबर, २०२२ दरम्यान या गाड्या धावणार आहेत, अशी माहिती महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी दिली. दिवाळीच्या सुट्टीत महाविद्यालये व शाळांना सुट्टी असते. त्यामुळे अनेक कुटुंबे मुलांसह गावी, धार्मिक स्थळे किंवा पर्यटनस्थळांना भेटी देण्याचे नियोजन करतात. तर नोकरीनिमित्त बाहेर असणारे कर्मचारीही या सणात आपल्या घरी जात असतात. अशावेळी हे सर्व प्रवाशी एसटीला प्राधान्य देतात. त्यामुळे यंदा दिवाळीच्या सणात जोडून आलेल्या सुट्ट्या पाहता महामंडळाने दरवर्षी प्रमाणे नियमित बस फेऱ्या बरोबरच प्रवासी गर्दी लक्षात घेऊन १४९४ जादा बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत. प्रवाशांची वाढती गर्दी पाहून टप्प्या-टप्प्याने गाड्यांची संख्याही वाढविण्यात येणार आहे. मध्यवर्ती कार्यालयातील वाहतूक खात्यामार्फत २९ सप्टेंबर रोजी सर्व विभागांना दिलेल्या आदेशानुसार जादा गाड्या आरक्षणासाठी उपलब्ध करून दिल्या आहेत.

औरंगाबाद प्रदेशातून ३६८, मुंबई २२८, नागपूर १९५, पुणे ३५८, नाशिक २७४ व अमरावती येथून ७१ गाड्या सोडण्यात येतील. बसच्या आरक्षणासाठी प्रवाशांनी एसटी महामंडळाच्या www.msrtc.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळा बरोबरच msrtc mobile reservation App चा वापर करावा. एसटी महामंडळाने 'अमृत ज्येष्ठ नागरिक' योजनेतंर्गत ७५ वर्षावरील नागरिकांना एसटीच्या सर्व सेवेमधून मोफत प्रवास लागू केला आहे. तर ६५ ते ७५ वर्षादरम्यानच्या ज्येष्ठ नागरिकांना सर्व सेवांमधून ५० टक्के सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे. त्यामुळे दिवाळीच्या सणात जेष्ठ नागरिकांनीही या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन चन्ने यांनी केले आहे.